पुणे, किशोर– वर्ष ५३, अंक ५ वा, मे २०२४, (मासिक)– किंमत रु. ७/– पृष्ठे– ५२
Pune, Kishor- Vol. 53, Issue- 5, May 2024 (Monthly)- Price Rs. 7/- Pages- 52

# किशोर

मे २०२४





# माझा महाराष्ट्र

■ विनय मिरासे





महामनांचा महाराष्ट्र हा, महान इथले गुरू !
मानवतेच्या महान रिती, इथेच झाल्या सुरू.

इथेच झाले, शिव-संभाजी, रयतेसाठी जगले!
राष्ट्र-देवते चरणी अर्पिले, प्राण-फुलांचे झेले.

शाहू, तुका अन् एका, चोखा, सत्याचरणी सारे!
इथे जागले राष्ट्रामधले, प्रवर्तनाचे वारे!

हरित-क्रांतीचा जनक येथला, वंचितांचा त्राता!
भारतभूच्या सकल जनांचा, महाराष्ट्र हा भ्राता!

तुकडोजींच्या खंजिरीने, इथे जागली मने!
कुसुमाग्रजांदि शब्द-प्रभुंनी, घडविली जीवने!

संत डेबुच्या कर्मफुलांचा, सुगंध सगळीकडे
बुद्धिवाद अन् त्यागामध्ये, महाराष्ट्र हा पुढे

यशवंतांच्या दूरदृष्टीचा, परिपाक हा असे!
प्रबोधनाच्या अग्र-भागी, महाराष्ट्र हा दिसे





भीम-फुल्यांच्या महद्गर्जना, इथे निनादून गेल्या!
अमानुषता नष्ट कराया, मुळात जन्मा आल्या

कर्मवीर नि महर्षी शिंदे, झटले विद्या - दाना
दृष्ट रूढींना संपविण्यास्तव, पणास लावले प्राणा

विज्ञानाच्या आर्षत्वाला, इथे मनातून मान!
राष्ट्र-मातेच्या हृदयामधला, महाराष्ट्र अभिमान!

संपर्क : ९४२०३६८२७२

**किशोर** मे २०२४, वर्ष ५३ वे, अंक ५ वा, चैत्र-वैशाख शके १९४६

▶ संपादक :
कृष्णकुमार पाटील, संचालक,
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे

▶ प्रकाशक :
विवेक उत्तम गोसावी
नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक
निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई

▶ निर्मिती अधिकारी : हेमंत बाबर

▶ अक्षरजुळणी : किशोर विभाग

▶ कार्यकारी संपादक :
किरण केंद्रे

▶ वितरण व्यवस्थापक
जालिंदर पाटील

▶ मुखपृष्ठ : सी. आर. शेलारे,
संपर्क : ९४२३०३००६२

▶ चित्रांकन : *घनश्याम देशमुख, धनश्री केळकर, राजेंद्र गिरधारी, अजय विभुते, बुद्धभूषण लोंढे, योगिता धोटे, गणेश ढवळे, अमृता ढगे, माईंडईट संवाद*



## अंतरंग


- माझा महाराष्ट्र ........ *विनय मिरासे* ........ ०२
- सुट्टीतील अनुभव ........ *गौरी लागू* ........ ०६
- पाण्यावर उमलणारं फूल ........ *किरण बोरफळे* ........ १०
- चांदुल्या ........ *दासू वैद्य* ........ ११
- शब्दांची गंमत जंमत ........ *मुकुंद टाकसाळे* ........ १२
- मामाचा गाव ........ *विजय नांगरे* ........ १५
- राजूची करामत ........ *डॉ. संजय ढोले* ........ १६
- चला चित्र रंगवूया ........ *धनश्री केळकर* ........ १९
- निष्कर्ष आणि नियम ........ *डॉ. पंडित विद्यासागर* ........ २०
- पिटुकला उंदीर आणि आळशी मांजर ........ *सेवियर पिरोट्टा, अनु. माधुरी दीक्षित* ... २२
- चित्रकोडे ........ *घनश्याम देशमुख* ........ २५
- झाडाच्या त्रिपदी ........ *हेमंत गोविंद जोगळेकर* ........ २६
- पोलीस दिदी ........ *डॉ. प्रदीप आवटे* ........ २९
- रायगडाची सहल ........ *अभिजित पेंढारकर* ........ ३०
- जंगली बापू ........ *मृणालिनी वनारसे* ........ ३४
- चित्रकोडे ........ *घनश्याम देशमुख* ........ ३७
- कुतूहल ........ *अमित डहाणे* ........ ३८

**बालविभाग**

- भावी आधारस्तंभ ........ ४०
- उमलती प्रतिभा ........ ४२
- चित्रकथा : पाठलाग ........ *घनश्याम देशमुख* ........ ४४
- अगं अगं मुंगे... ........ *सुनंदा भावसार* ........ ४६

**ENGLISH SECTION**

- From my bicycle ........ ***Renuka Billore*** ........ ४७
- When, River talks with Uday ........ ***B. N. Chaudhari*** ........ ४८
- Funny Puzzle ........ ***Ghanshyam Deshmukh*** ........ ५०





▶ ऑनलाईन वर्गणीकरिता : www.kishor.ebalbharati.in

वार्षिक वर्गणीची रक्कम रु.८०/- मनीऑर्डर अथवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेच्या पुणे शाखेवरील डिमांड ड्राफ्टद्वारे संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ, या नावाने खाली नमूद केलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावी. धनादेश स्वीकारला जाणार नाही.

**पत्रव्यवहाराचा पत्ता: कार्यकारी संपादक, किशोर, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,** सेनापती बापट मार्ग, पुणे- ४११००४, संपादकीय : ०२०- २५७१६१०७,
वितरण व तक्रार : ०२०-२५७१६२४४, ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in





प्रिय किशोर

नमस्कार,

मी मागील एक दोन वर्षांपासून किशोर मासिक वाचतो आहे. खरंतर आमच्या गावच्या शाळेतील शिक्षक आदरणीय श्री माधव गव्हाणे सर यांच्या माध्यमातून माझी किशोरशी भेट झाली. भेट म्हणण्यापेक्षा ओळख झाली असे म्हणता येईल. माझी नात निदा ही आमच्या गावच्या शाळेत (जिल्हा परिषद प्राथमिक शाळा रायपूर ता. सेलू) इयत्ता तिसरीत शिकत आहे. ती इयत्ता दुसरीत असताना तिची एक कविता आणि एक चित्र 'किशोर' मासिकात प्रसिद्ध झालं, तेव्हा सरांनी आणि तिच्या वर्गमित्रांनी तिचा गौरवपूर्ण सत्कार केला, तिचं अभिनंदन केलं. तिला खूप आनंद झाला. त्यातूनच तिला प्रेरणा मिळाली आणि तेव्हापासूनच तिच्यातील कवयित्री आणि चित्रकार जागा झाला. तिने सात ते आठ कविता लिहिल्या आहेत आणि बरीच चांगली चांगली चित्रे काढलेली आहे. तसेच तिला वेगवेगळ्या कवींच्या कविता वाचनाचा आणि कविता मुखोद्‌गत करण्याचा छंद लागला आहे. वेगवेगळ्या कवींच्या तिने जवळ जवळ पंचवीस ते तीस कविता पाठ केल्या आहेत.

पहिल्यांदा माझी नात निदा हिने बनवलेलं चित्र आणि दुसऱ्यांदा तिने लिहिलेली कविता 'किशोर' मासिकातून प्रकाशित झाली, तेव्हा मला काही असं विशेष नवल वगैरे काही वाटलं नाही. परंतु एके दिवशी गव्हाणे सरांनी फोन करून माझं अभिनंदन केलं तेव्हा मी भांबावून गेलो आणि मला आश्चर्य वाटलं की सरांनी माझं अभिनंदन कशासाठी केलं? मी स्वत:शीच विचार करू लागलो की, मी सर्वसामान्य शेती करणारा माणूस, आणि मी असं कोणतं काम केलं जे सरांच्या दृष्टिकोनातून अभिनंदनास्पद आहे. मी शाळा भरल्यानंतर धावतच शाळेत गेलो. सरांनी परत गळाभेट घेऊन माझं अभिनंदन केलं आणि मला 'किशोर'कडून निदाला आलेले मानधन सत्तर रुपये माझ्या हातात ठेवत म्हणाले, ''तुमची निदा आता फार मोठी झाली आहे. तिची कविता आणि चित्र 'किशोर' मासिकात प्रसिद्ध झालं आहे. जे महाराष्ट्र राज्यातील अव्वल दर्जाचं मासिक आहे. पालक ह्या नात्याने आपल्यासाठी ही आपल्या सर्वांसाठी अत्यंत अभिमानाची गोष्ट आहे.'' एवढे म्हणत त्यांनी मला 'किशोर' मासिकाचा एक अंक भेट देऊन वाचण्याचा आग्रह केला.

सरांच्या आग्रहास्तव मी 'किशोर'चा अंक मी मन लावून वाचला आणि तो मला खूप खूप आवडला. 'किशोर' मासिकाची सुबक मांडणी, त्यातील प्रेरणादायी लेख, कथा, कविता, मनोगत, त्यातील बालसाहित्यिकांचे साहित्य, लहान मुलांनी लिहिलेल्या कविता, आणि त्यांनी रेखाटलेली चित्रे पाहून वाचून खूप खूप आनंद झाला. मन प्रफुल्लित झालं, मी आता सातत्याने 'किशोर' मासिक वाचत आहे. तसेच मी आता 'किशोर'व्यतिरिक्त इतरही पुस्तके वाचू लागलो आहे. 'किशोर'मुळे मला वाचनाची गोडी लागली आहे. हे मी अभिमानाने सांगू इच्छितो की माझी पुस्तकांशी तुटलेली नाळ 'किशोर'मुळेच परत जुळली आहे. इतकेच नव्हे तर आमच्या गावचे कित्येक पालक किशोरमासिक वाचत आहेत. त्यांना पण 'किशोर'मुळेच वाचनाची सवय लागली आहे. मला वाटतं आमच्या गावात दर महिन्याला 'किशोर' मासिकाचे पन्नास अंक येतात. माझी नात निदा आणि इतर विद्यार्थीसुद्धा अभ्यासक्रमातील पुस्तकांव्यतिरिक्त इतर पुस्तके सातत्याने वाचत आहेत. निश्चितच यामुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानात भर पडेल व भविष्यात याचा त्यांना खूप फायदा होईल. याचं श्रेय फक्त आणि फक्त 'किशोर'ला आणि माधव गव्हाणे सरांना जातंय.

आपला,

**शेख जलील शेख इब्राहिम,**

रा.रायपूर ता. सेलू. ४३१५०३.

## हितगुज

# सुट्टीची गोष्ट..

किशोर मित्रमैत्रिणींनो,

सूर्याच्या सुट्टीविषयी जसविंदर कौर बिंद्रा यांनी एक उत्तम गोष्ट लिहिली आहे. तुम्हांला ही गोष्ट तुमच्या सुट्टीच्या निमित्ताने सांगावीशी वाटते. ही गोष्ट जर समजून घेतली तर तुमची आताची आणि यापुढे येणाऱ्या पुढील प्रत्येक सुट्टी तुम्हांला खूप आनंदात, उत्साहात, नवनवीन बाबी शिकण्यासाठी उपयोगी पडेल अशी खात्री वाटते. तर गोष्ट अशी की.. खूप खूप वर्षांपूर्वी एक दिवस सूर्याला असे वाटले की, या पृथ्वीवरील सर्व जण सुट्टीची मजा घेत असतात. कोणी एक दिवसाची, कोणी आठवड्याची, कोणी महिन्याची तर कोणी त्यापेक्षा अधिक दिवसांची सुट्टी घेत असतो... आपण मात्र रोज इमानेइतबारे एका गोलार्धातून दुसऱ्या गोलार्धात आपले काम न चुकता, न थकता, न कंटाळता, न तक्रार करता पार पाडत असतो. आता आपण पण सुट्टी घेऊया..

... आणि त्याप्रमाणे सूर्याने कोणालाही न सांगता एक दिवस अचानक आभाळात दडी मारली. लपूनच बसला म्हणा ना! सर्वत्र अंधारच अंधार.. पृथ्वीवर तर कोणालाच कोणी दिसेना. पक्षांना, प्राण्यांना रस्ते सापडेना. शेतकरी, कामगारांना काम करता येईना. सगळ्यांना अन्न मिळेनासे झाले. सगळेच उपाशी राहू लागले. सूर्यप्रकाश नसल्याने ना रोपट्यांना अन्न तयार करता येत होते ना नद्यांना पाणी मिळत होते. कारण पर्वत शिखरांवरील बर्फच वितळत नव्हता. पृथ्वीवर एका ठिकाणी तर क्रिकेटचा सामना रंगात आला असतानाच अचानक अंधार पडल्याने लोकांनी गोंधळ घालायला सुरुवात केली. सूर्य दडलेल्या जागेवरून हळूच डोकावून हा सारा गोंधळ पाहत होता. त्याच्याशिवाय साऱ्या निसर्गाचेच चक्र फिरायचे थांबले होते. आता मात्र प्राणी, पक्षी, मनुष्य, निसर्ग या सर्वांनाच होणारा त्रास पाहून सूर्याला खूपच वाईट वाटले आणि त्याच्या मनात विचार आला की आपण थोडा वेळच सुट्टी घेतल्याने जर का या सर्वांनाच इतका त्रास होणार असेल, इतका प्रचंड गोंधळ होणार असेल तर अशी सुट्टी आणि तिची मजा काय कामाची? आणि मग सूर्याने आपली सुट्टी रद्द केली आणि तो रोज इमानेइतबारे एका गोलार्धातून दुसऱ्या गोलार्धात आपले काम न चुकता, न थकता, न कंटाळता, न तक्रार करता करू लागला. आणि पृथ्वीवर पहिल्यासारखे सर्व काही व्यवस्थित झाले.

मित्रमैत्रिणींनो, सुट्टी म्हणजे फक्त आराम करणे, उशिरापर्यंत अंथरुणात लोळत पडणे, वेळ जात नाही म्हणून टाईमपास करणे नक्कीच नाही. सुट्टी म्हणजे आपल्याला ऊर्जा देणारी, टवटवी देणारी, नवनवीन गोष्टी, कौशल्य शिकवणारी उत्साहवर्धक बाब असते. जी तुम्हांला नवनवीन आणि चांगली कामे करण्यासाठी ताजेतवाने करत असते. गोष्टीतील सूर्याने जसे सुट्टीच्या काळात निरीक्षण आणि आत्मपरीक्षण केले तसेच तुम्हीही जरूर करा. या सुट्टीचा सदुपयोग कसा करायचा हे ठरवून इमानेइतबारे आपले काम, आवड, छंद, सत्कृत्य न चुकता, न थकता, न कंटाळता, न तक्रार करता जरूर करून पहा. शाळेबरोबरच सुट्टीदेखील आपल्याला काहीतरी भन्नाट शिकवत असते. ते तुम्ही जरूर आनंदाने शिकून पहा...

**किरण केंद्रे**
कार्यकारी संपादक



गौरी लागू

# सुट्टीतील अनुभव

पहाटे पहाटे पाराजवळ टेंपो येऊन थांबला. अजून सगळीकडे अंधारच होता. तानी मावशी, कौसल्या मावशी, मीनाबाई, सुभद्रा आणि गावातल्या दहा-बारा बायका जमल्या होत्या. पहाटे लवकर उठून आवरून, सावरून बायका जमल्या होत्या.

''बायांनो, चांगलं काम करा! संध्याकाळी परत याल तेव्हा चार-पाचशे रुपयांचा रोज घेऊनच या.'' नारायणराव म्हणाले.

''पण जमंल नं आम्हांला, घरचा स्वयंपाक वेगळा, पुण्याला कार्यालयात लग्नाचं जेवण बनवायचं जमंल ना?'' कौसल्या मावशीनं विचारलं.

''कौसल्या बाई, वाघ हाय तुम्ही... कामाला तुमच्या हातचं जेवलेला विसरायचा नाही जल्मात!'' नारायणराव म्हणाले, बाया जरा शांत झाल्या. ''चला निघा निघा.''
''अव पण शिवम  कुठं हाय? त्याला देणार हुता ना

आमच्या संग!''

''नाही का आला अजून? थांब आता पुढ्यात आणून घालतो.'' असं म्हणून नारायणराव शेजारच्या गल्लीत कोण आलं म्हणून गल्लीतली कुत्रीही जागी झाली. त्यांना चुकवत चुकवत नारायणराव शिवमच्या घराकडे निघाले. गल्लीच्या अगदी शेवटाला शिवमच घर!

तीन बहिणींच्या पाठीवर झालेला हा शिवम. सर्वांचा लाडका... नुकतीच दहावीची परीक्षा झालेली... त्यामुळे शिवम रिकामाच होता. कोपऱ्यावर चकाट्या पिटत बसणं आणि उरलेला वेळ मोबाईलमध्ये डोकं खुपसून बसणं हाच त्याचा उद्योग. नारायणरावांनी पुण्याला कंत्राट घेतलं होतं. गावातल्या बायका कामाला निघाल्या होत्या. त्यांच्याबरोबर कुणी असावं म्हणून शिवमला पाठवायचं असं नारायणरावांनी ठरवलं.

शिवमनं खूप कुरकुर केली. शहरात कसं नाहीच जायचं याची १० कारणं सांगून झाली. शेवटी नारायणरावांनी शिवमच्या वडलांनाच गळ घातली. पोरगं थोडंफार कमावल, बायांना सोबत होईल असं काय काय.....एक दिवसाचा प्रश्न म्हणून वडील शिवमला पाठवायला तयार झाले.

शिवम मात्र हटूनच बसला. ''मला बायांबरोबर जायचं नाही. हट्...... मी काय करू दिवसभर....'' शिवम तोंड वेंगाडत म्हणाला.

''अरं, तुझा एक दिवसाचा रिचार्ज मारतो मी. १ जीबी डेटा...

''बरं चल.. २ जीबी डेटा मारतो एक दिवसाचा'' नारायणरावांची ही मात्रा कामी आली. शुभम जायला तयार झाला. ही झाली संध्याकाळची गोष्ट... आत्ता मात्र शिवम च्या घरात अंधारच होता. नारायणराव त्याच्या घरी पोचले, तेव्हा दारात बसलेली मांजर फिस्कारली. नारायणरावांनी आधी तिला बाजूला केलं अन् शुभमच्या घराचं दार खटखटवलं....

इकडं पारावर जमलेल्या बायका एकमेकींशी गप्पा मारत बसल्या. ''आपलं घर सोडून असं कुठे कामाला गेलो नाही आपण. कोण माणसं असतील, काय काम असेल काय की. आमच्या मालकांना समजावता समजावता थकले मी.'' सीतामावशी म्हणाली.

''तो शिवम आहे म्हणून ह्यांनी सोडलं मला. सीतामावशी, चार पैसे मिळाले जास्त, तर कुठं बिघडलं? शहरात जाऊ, मज्जा करू... काम तर आहेच!'' सुभद्रा त्यात सगळ्यात तरुण. कधी एकदा टेंपोत बसतीय असं झालेलं तिला!

नारायणराव शिवमला पुढे घालून झाले. ''काय रे एवढा उशीर... आता पोचायला उशीर....'' शिवमला सगळ्या जणी टाकून बोलल्या. भाजीचा टेंपो नारायणरावांनी स्वच्छ केला. एक एक जण दुसरीला हात देत टेंपोत चढू लागली. तानी मावशी, सीताबाई कशाबशा वर चढल्या. दाटीवाटीनं बायका टेंपोत बसल्या. शिवम सगळ्यात शेवटी टेंपोत चढला. जिन पँट, टी शर्ट, केस विंचरलेले. गावातल्या बायांची जबाबदारी आता आपल्यावर आहे या कल्पनेनं एकदम मोठा झालेला शिवम!

''सावकाश न्यायचा टेंपो....... काम झालं की बायकांना घेऊन संध्याकाळी परत. कुठ जायचं नाही त्यांना सोडून.'' नारायणरावांनी टेंपो चालकाला दरडावलं. शिवमला जागा नव्हती टेंपोत बसायला. तो उभाच राहिला. मागच्या खिशात मोबाईल खोचलेला. टेंपो सुरू झाला तसं साऱ्या बायांनी देवाचं नाव घेतलं. गावची म्हाळसा, वेशीवरचा म्हसोबा सगळ्यांची नाव घेऊन झाली. टेंम्पो एक गचका खाऊन निघाला.

''नारायणराव, तेवढं रिचार्ज मारा.... ८ वाजता दुकान उघडते....'' शिवमनं ओरडून सांगितलं. ''रिचार्ज मारतायंत बरं झालं, पोचल्याचा फोन करता येईल मालकास्नी'' सुभद्रा म्हणाली.

आता हळूहळू उजेडायला लागलं.... सीतामावशीचा डोळा लागला. कौसल्यामावशीनं जपाची माळ काढली अन् ती मणी ओढत बसली. सकाळ सकाळी वारा खात शुभमला हुश्शार वाटू लागलं. पुण्याला जायचं म्हणून भारी वाटू लागलं. दहावीचा रिझल्ट लागू दे चांगला की पुण्यालाच यायचं शिकायला हे त्यांनी ठरवूनच टाकलं.

पम्या, बेंबट्या सगळ्यांनी तेच केलं. इकडं रिझल्ट लागला की, पुण्याची गाडी धरायची... ठरलंच आपलं ! जाता जाता कुठलं कॉलेज दिसतं का हे बघायचं हेही पक्कं केलं त्यानं मनाशी !

टेंपो हायवेला लागला. भोवतीनं भरार निघून जाणाऱ्या गाड्या. टेंपोनं कडेकडेनं पुण्याची वाट धरली. बायका दाटीवाटीन टेंपोत बसलेल्या. टेंपोच्या हालचाली सोबत

माना डुलत होत्या. लांबनं पाहिलं तर फक्त मानाच दिसतील बायांच्या. कुणाच्या ताठ, कुणाच्या बसक्या, कुणाच्या सुजलेल्या, डोईवर पदर. शहरात जाण्याच्या कल्पनेने भेदरलेल्या. त्या दाटीवाटीतही बायांनी शिवमला जागा करून दिली. हिरो नाईलाजास्तव त्या बायकांमध्ये बसले. शहामृगासारख्या मानेच्या बाया आणि त्या तांड्याचा म्होरक्या जणू शिवम!

तास, दीड तासानं पुण्याच्या बाहेर एका कार्यालयात टेंपो थांबला. कॉलेज बिलेज काही दिसलेच नाही.

''चला उतरा पटापटा आणि त्या मागच्या हॉलमध्ये जाऊन थांबा. सीतामावशी दमली का?'' शिवमनं विचारलं.

''दमते काह्याची? आत्ता तर दिवस सुरू झाला.'' असं म्हणत बाया मागच्या हॉरमध्ये गेल्या.

नारायणरावांनी सांगितल्याप्रमाणे, शिवमन तिथला कंत्राटदार शोधून काढला. हिंजवण्याहून टेंपो पोचला. बायका मागच्या हॉलमध्ये जाऊन बसल्याचं कंत्राटदाराला सांगून शिवम हॉलकडे गेला.

सगळ्या बायका बुजून जावून एका कोपऱ्यात बसलेल्या ''भिऊ नका मी आहे ना.'' शिवम म्हणाला.

''भिती नाही गड्या, पर काम काय करायचं ते तर विचार!'' मग शिवमन कंत्राटदाराला गाठला.

''५०० माणसांच्या स्वयंपाकाची तयारी करायचीये. भाजी चिरायची, कणीक मळायची, पापड तळायचे... स्वयंपाक आमचे आचारी करतील. भांडी घासायची नंतर''

''अहो, आमच्या बायकापण भारी स्वयंपाक करतील. लई चव आहे त्यांच्या हाताला.'' सुभद्रा फणकारली.

''नको, नको... तुम्हांला फक्त मदतीला आणलंय इथं......'' कंत्राटदार फिस्कारला!

''पनीर, डाल-फ्राय, पुलाव नाही जमायचं तुम्हांला.'' असं म्हणत कंत्राटदार निघून गेला.

असं वरकामाला आपल्याला इथे आणलं म्हणून नाराज झाल्या खरं तर! नारायणरावांनी नीट विचारायला पाहिजे होतं, आता काढा उष्टी खरकटी!'' शिवमलाही हे खरंतर पसंत नव्हतं! 'ही काम करायला का आलो आपण?' या विचारानं तो अस्वस्थ झाला.

थोड्याच वेळात बायांना आणि त्याला चहा, नाष्टा मिळाला आणि समोर भाज्या येऊन पडल्या. काकडी,



टोमॅटो, लिंब, फ्लॉवर, मटार यांच्या वासाने खोली भरून गेली. आता आपलं इथे काही काम नाही, असं म्हणून शिवम बाहेर पडला. सगळा परिसर बघून झाला पण नारायणरावानं रिजार्च काही मारला नाही. डेटाशिवाय दिवस कसा काढायचा या चिंतेत शिवम रस्त्यावर आला.

एखादं वाहन गाठून पुण्यात जाऊन यावं का? असा विचार आला, पण त्यानं तो झटकून टाकला. नारायणरावांनी आपल्या भरवशावर केलंय हे काम. आपण गद्दारी करायची नाही. गुमान तो त्या भटारखान्याच्या शेजारी जाऊन बसला. बायांची काम चालू होती.

''लौकर लौकर आटपा....काकडी बारीक चोचवा आज्जी....फ्लॉवरची फुलं ठेवा फक्त, टोमॅटो बारिक....'' कार्यालय मालकाच्या या सूचना शुभमला बोचू लागल्या. ''नीट बोलावं माणसानं.... काय समजतो काय हा. उगच आल्या बायका याची बोलणी खायला.''

''तांदळातले खडे दिसत नाहीत का ओ मावशी''.... सीतामावशीच्या हातातल पातेलं हिंदकाळंलच या आवाजानं. आता मात्र शिवमला राहवेना, ''अहो दादा करतीय ना ती. राहिला का खडा थांबा बघतो मी.'' शिवमने तांदूळ बघून घेतले. एक दोन खडे निघाले. ''घाबरू नको सीतामावशी'' सीतामावशीनं शिवमची बोट मोडून दृष्टच काढली. असं प्रत्येक गोष्टीतच मालकाला काही बाही खटकायला लागलं!

''पर्वा तुमच्या शेजारच्या गावच्या बाया आल्या होत्या त्या बऱ्या तुमच्यापेक्षा पटपट उरका आता.'' मालक ओरडून गेला आणि बाया खचल्याच. समोरच्या कामाकडे बघत बसून राहिल्या. आता नाही व्हायचं आपल्याच्यानं या कल्पनेनं गळाठूनच गेल्या.

सीतामावशी, तानीमावशी, सीताबाई कुणालाच कळेना काम कसं उरकावं! सुभद्रेनं तर ओढणीच लावली डोळ्याला. कोपऱ्यात बसलेल्या शिवमला चीड आली. त्या मालकाने बायांना घाबरवून काय मिळाल.

''त्या नारायणरावाला फोन लाव शुभम, नाही जमायचं आम्हांला! टेंपोवाल्याला बोलाव जाऊ निघून!'' सीताबाई रडत रडत बोलू लागल्या.

काय करावं शिवमलाही कळेना. भाजी अस्ताव्यस्त पसरलेली, पातेली जिकडेतिकडे! बटाटे उकडून झालेले; शिवमने आता या पसाऱ्यात उतरायचं ठरवलं. सगळ्या भाज्यांचे ढीग केले. एकेक ढीग एकेकीला वाटून दिला. विळ्या, पराती सगळं जमवून दिलं. कोपऱ्यातल्या बायकांनी विळ्यांचा ताबा घेतला. कामं हळूहळू मार्गी लागली. कणीक मळायलाही शिवम पुढे झाला.. बघता बघता शिवमनी कामाची व्यवस्था लावली.

''बायांनो, घरचं काम करायला सुचतं आणि हे जमत नाही होय. घरी हेच करतो की आपण!'' शिवम बरं झालं पोरा आलास आमच्या बरोबर'' सीतामावशी म्हणाली.

शिवमला एकदम मोठं झाल्यासारखं वाटू लागलं. हात धुऊन आता तो बाहेर जायला निघाला. नारायणरावांनी रिजार्ज मारला होता. २ जीबी डेटा मिळाला म्हणून शुभम भलताच खूष झाला. आता बाहेर कार्यालयात गर्दी जमू लागली होती. इतकी नटलेली सिनेमातल्या सारखी माणसं शिवमनं पाहिलीच नव्हती.. एक कोपरा गाठून तो माणसं बघत बसला. कुणी शाहरुख, कुणी रणवीर, कुणी आलिया कित्येक चेहरे दिसू लागले त्याला. बराच वेळ तो या खेळात रमला. इतका की रिजार्च मारलेला मोबाईलही तो विसरला.

आता जेवणाची वेळ झाली होती. स्वयंपाकाचा वास येऊ लागला. त्याला एकदम सीतामावशी आणि इतर बायकांची आठवण झाली. झटकन तो भटारखान्याजवळ पोचला. तिथल्या भाज्या आता दिसत नव्हत्या. बायकाही दिसेनात. सुभद्राचा आवाज आला म्हणून तो मागे गेला बायका मोठमोठाली पातेली, घमेली घासत होत्या. तानी मावशीला पातेलं उचलतच नव्हतं. शिवम चटकन पुढे झाला. तानी मावशीला मदत करता करता पुढे होऊन भांडी घासायला लागला.

''गुणाचं माझं पोर, आईनी पाहिलं नाही म्हणून, विश्वास नाही बसणार तिचा'' किती काम केलं लेकानी सीतामावशीनं पुन्हा शिवमची माया काढली.

इतकं सगळं करून बायका थकून गेल्या. जे मिळालं ते जेवण जेवल्या. शिवमही त्यांच्यात बसून जेवला. चार वाजून गेले. मालकानं येऊन सगळ्यांचा हिशोब केला. सुभद्रानी शिवमलाच पुढे केलं. त्यांनी बरोबर हिशोब करून ज्याचे त्याला पैसे दिले.

''अन् हे तुझे'' मालक गुरकावला. शिवमन पैसे खिशात ठेवले. सगळे टेंपोत बसले शिवम मात्र उभाच राहिला.


**संपर्क** – ९८२२७५६८८२

# पाण्यावर उमलणारे फूल

**किशोर बोरफळे**

दररोजच्या जीवनामध्ये आपण परिसरात, शाळेत, घरी अनेक विविध वनस्पती, त्यांची फुले पाहत असतो. त्याचबरोबर अनेक वनस्पतींचे निरीक्षण करत असतो. वनस्पतीमधील पाण्याचे वहन ही संकल्पना समजून घेण्यासाठी 'पाण्यावर उमलणारे फूल' हा सहज सोपा प्रयोग आपण पाहणार आहोत.

**उद्‌दिष्ट –** वनस्पतीमध्ये होणारे पाण्याचे/अन्नघटकाचे वहन समजून घेणे. (जलवाहिन्या/केशनलिका)



**साहित्य –** घोटीव कागद, पाणी, पसरट भांडे, कात्री, इत्यादी


**कृती :** १) सर्वप्रथम घोटीव कागदाचा ३ ते ४ से.मी. त्रिज्या असलेला एक वर्तुळ कात्रीच्या साहाय्याने कापून घ्या. २) तयार झालेल्या वर्तुळाचे बाजूच्या आकृतीप्रमाणे कात्रण करा. ३) तयार झालेले कात्रण अशा प्रकारे दिसेल. ४) कागदी पाकळ्यांना चित्रात दाखवल्याप्रमाणे आतल्या बाजूने घड्या घाला. ५) घडी घातलेल्या फुलाचा भाग वर राहील याची काळजी घ्या व ते फूल पसरट भांड्यात पाणी ओतून त्यामध्ये अलगदपणे सोडून द्या व त्याचे काळजीपूर्वक निरीक्षण करा.
६) आपले कागदी फूल पुढीलप्रमाणे दिसेल.



**निरीक्षण –** कागदी फुलामध्ये आतल्या बाजूस दुमडलेल्या पाकळ्या हळूवारपणे उमलताना दिसतील.

**असे का होते? –** कागद हा झाडाच्या खोडापासून बनलेला असतो. वनस्पतीच्या खोडामधील जलवाहिन्या/केशनलिका त्या कागदामध्येही असतात. त्यामुळे जेव्हा आपण कागदी फूल हे पाणी भरलेल्या पसरट भांड्यात सोडतो तेव्हा ते पाणी कागदातील जलवाहिन्यांमार्फत पाकळ्यांच्या दिशेने वाहिले जाते. त्यामुळे आपणास पाकळ्या फुलताना दिसतात.

**संपर्क** – kishorborphale@gmail.com







# चांदुल्या

■ दासू वैद्य

काळ किती लोटला रे
भेट नाही, गाठ नाही
तुझ्याकडं येण्यासाठी
धड नीट वाट नाही

उंच वरी आभाळात
ठेपा तुझा दूर दूर
येतो दाटून सारखा
माझा बापुडीचा उर

काय झालं, कसं झालं
आठवेना मला काही
तडफडे बाळाविना
जशी अभागीण आई

का रुसलास राजा
गेला कसा रे निघून
रोज पाहते सोनुल्या
तुला दुरून दुरून

राग, लोभ, मानपान
झालं गेलं विसरावं
आपल्याच अंगणात
कधीमधी घसरावं

माझ्या लाडक्या मुनुल्या
चांदण्यात रमलास ?
गोल गोल फिरुनिया
अंधारात दमलास ?

घोर अजून जीवाला
काय तुझं खाणंपिणं
रात रात जागरण
कसं संन्याशाचं जीणं

सूर्य जरी आगजाळ
रात तुझ्याच नावाची
याद कधी येते ना रे
जुन्या आपुल्या गावाची

तुला पाहून आभाळी
ईद होते इथं खास
चतकोर दर्शनाने
सुटतो रे उपवास

घडघडबोल सोन्या
तुला धाडीला सांगावा
तुझ्यासाठी तिथं एक
वाटे चांदवा टांगावा

किती कोरडा कोरडा
तिथे असते ना पाणी
झोपताना थोपटून
कोण म्हणतंय गाणी

माझ्या जीवाच्या तुकड्या
धाड सुखाचा निरोप
टक्क उघड्या डोळ्यांना
लागू दे रे शांत झोप

तुझ्यासाठी धाडीन आता
लाडू, चिवडा, चकल्या
पुढं पुढं होतं काय
पाहा लाडक्या चांदुल्या

संपर्क – ९४०३५८४१११



मुकुंद टाकसाळे




# शब्दांची गंमत जंमत

या सुट्टीत ढोलूराम आजोळी गेला नाही. कारण त्याचीच मावसबहीण सई सुट्टीसाठी त्याच्या घरी म्हणून आली होती. ही सई म्हणजे दुसरी झाशीची राणी. ती चांगलीच शूर होती. आणि जर पोरा-पोरींच्यात भांडण झालं तर ती एक दोन पोरांना गुद्दे मारायलाही कमी करायची नाही. गुद्दे मारता आले नाहीत तर त्यांना जोरात चिमटे काढायची. त्यामुळे तिच्या वाट्याला कोणी फारसं जायचंच नाही. कोण हौसेनं स्वतःच्या नाकावर ठोसा मारून घेईल किंवा चिमटे काढून घेईल? पण सई शूर असली तरी भांडकुदळ नव्हती. आपण होऊन कुणाची खोडी काढायला ती जायची नाही. ती ढोलूरामपेक्षा दोन वर्षांनी लहान होती. तिला सुट्टीसाठी म्हणून तिच्या आई-बाबांनी पत्त्यांचा कॅट घेऊन दिला होता. पण ढोलूरामला पत्ते कसे खेळतात, हेच ठाऊक नव्हतं. मग तिनं ढोलूरामला पहिल्यांदा झब्बू शिकवला. मग गड्ड्या झब्बू शिकवला. कधी कधी त्यांच्यात सलीलदादाही सामील व्हायचा. पण त्याला पत्ते फारसे आवडायचे नाहीत. त्यामुळे तो पुस्तकात डोकं खुपसून बसायचा. झब्बूत शिकण्यासारखं फारसं काही नव्हतंच. पत्तावर पत्ते टाकत जायचं. पण कधी कधी लागोपाठ दोन तीन वेळा गड्ड्या झब्बू मिळाला की ढोलूराम चिडायचा. एकदम पत्ते फेकून द्यायचा. मग झाशीची राणी त्याला फटका

मारायची. म्हणायची, ‘ढोल्या, पत्ते खराब झाले तर कुणालाच खेळता येणार नाही, समजलं?

‘‘मग मलाच सारखा सारखा झब्बू का मिळतो?’’ रडवेल्या आवाजात त्यानं विचारलं.

पण हे खरं नव्हतं. एकदा कधी नव्हे ते सलीलदादाही त्यांच्याशी झब्बू खेळायला आला. आणि लागोपाठ चार वेळा ढोलूरामने त्याला झब्बू दिला. झब्बू दिला रे दिला की ढोलूराम आरडाओरडा करत नाचत सुटायचा.

‘‘हे ऽऽऽ ढँटडटम ढडम ढडम’’ असं तो जोरजोरात गाणं म्हणायचा. आपण आपल्या थोरल्या भावाला हरवतो आहोत, याचा ढोलूला खूप आनंद व्हायचा. एक नवा खेळ आपल्याला खेळायला आला, याचाही त्याला खूप आनंद होत असे. मग सईनं त्याला ‘पाच तीन दोन’ शिकवलं. हाही खेळ त्याला खूपच आवडायला लागला. कधी कधी शेजारच्या सईच्याच वयाच्या गुड्डी आणि बेबी त्यांच्याशी खेळायला यायच्या. मग ते मिळून ‘लॅडिस’ खेळायचे. बेबी जरा बनेल होती. तिची आणि गुड्डीची कायम जोडी अशी असायची. सईची आणि ढोलूरामची. बेबी-गुड्डी दोघी कायम जिंकायच्या. या दोघांना लाडू द्यायच्या. मग ढोलूरामची चिडचिड व्हायची. त्याच्या लक्षात आलं की खेळताना बेबी खुणा करायची. म्हणजे केसावरून हात फिरवला की किलवर. जीभ बाहेर काढली की बदाम... ढोलूच्या हे लक्षात आलं. मग त्यानं सईला हे सांगितलं. सईनं त्यांच्यावर लक्ष ठेवलं आणि नंतर बेबीला बुकलून काढलं. खेळताना फसवायचं म्हणजे काय? अशा वेळी ढोलूला सई खरोखरच झाशीची राणी वाटायची.

पण असली भांडणं तात्पुरती असायची. मार खाऊनही त्या दोघी रोज त्यांच्याशी खेळायला यायच्या. त्यातल्या बेबीने त्यांना ‘ठिकऱ्या’ खेळायला शिकवलं. त्या तिघी सागरगोटे खेळताना मात्र त्याला खेळायला घ्यायच्या नाहीत. उलट तो खेळायला आला की त्याला गुड्डी आणि बेबी चिडवायच्या. त्यामुळे त्याला हा खेळ कधीही खेळता आला नाही. त्याचप्रमाणे या पोरी पटापटा दोरीवरच्या उड्या मारायच्या पण ढोलूराम ढोलू असल्यानं त्याला अशा उड्या मारणं कधीही जमलं नाही. गुड्डीकडे भोवरा होता. तो तिनं त्याला कसा फिरवायचा ते शिकवलं.

एकदा ते झब्बू खेळत असताना ढोलूरामला झब्बू मिळाला. मग सई त्याला चिडवण्यासाठी म्हणाली, ‘ढब्बू



# ढोलूराम

रे ढब्बू तुला मिळाला झब्बू’

तिघी मुली यावर फिदी फिदी हसल्या. ढोलूराम मनातल्या मनात काही तरी जुळवत राहिला. मग सईला झब्बू मिळाल्यावर ढोलूराम म्हणाला,

‘सई गं सई तुला मिळाला झब्बू’

यावर सारे खदखदून हसले. पण ढोलूला यमक जुळवता आलं नाही, म्हणून ते हसले होते. ढोलूराम खट्टू झाला. ‘‘एँहँ बावळट, यमक जुळतया का तरी?’’ सई आणि झब्बू? सई म्हणाली. मग तो थोडी विचार करून म्हणाला, ‘सई गं सई तुला खेळता येतच नाही.’’

हे जरा बरं जुळवलं होतं. मग मात्र सईसकट सर्वांनी टाळ्या वाजवल्या. तेव्हापासून हा नवीनच खेळ पोरं खेळू लागली. शब्दांचे यमक जुळवायचे आणि हसत सुटायचे. मग घरातही त्याचा वापर सुरू झाला. जेवताना एकदा ढोलूराम आजीला म्हणाला,

‘‘आजी आजी करते भाजी’’ मग सई म्हणाली, ‘‘आजी, भाजी कर गं नीट, भाजीत पडलंय केवढं मीठ!’’

आजी एकदम म्हणाली, ‘‘खरंच की काय! भाजी खारट झाली का?’’यावर पोरं खीखी करून हसू लागली. सलीलदादा म्हणाला, ‘‘अगं आजी, ते गंमत करताहेत. भाजी मस्त झालीय.’’

लगेच ढोलू म्हणाला, ‘‘भाजी झालीय मस्त करतो आम्ही फस्त.’’

तसा कशाचा कशाला संबंध नाही. फक्त टला ट आणि री ला री जुळवायचं. सारी शब्दांची गंमत! म्हणजे मोठ्यांनाही ही गंमत आवडते तर!

हा सारा प्रकार मुलांना फारच मनोरंजक वाटला. घरी आल्यावर त्यांचाही असाच खेळ सुरू झाला –

''इंग्रजीत चंद्राला म्हणतात मून, मुकेशराव आहेत शाळेत प्यून''

आता सईनं असंच काही तरी नाव जुळवलं –

''ग्लासाला हॉटेलात म्हणतात गल्लास बबनरावांचे पैसे झाले खल्लास''

असलं काही तरी जुळवून सगळी मुलं खो खो हसत सुटायची. तेवढ्यात तिथं सलीलदादाचा मित्र बाळू बापट आला. गंभीर, चष्मेवाला. वर्गात त्याचा कायम पहिला नंबर असायचा. त्याला सई म्हणाली,

''बाळू बापट देऊ का चापट?''

मग ढोलूलाही जोर चढला.

''बाळू बाळू खातो वाळू''

बिचारा बाळू ! आल्या आल्या त्याला या वांड पोरांनी चिडवलं. पण तोही काही कमी नव्हता... त्यानंही त्यांना जमेल तसं चिडवलं. सईला तो म्हणाला, ''सई सई पिते शाई''

तसं ठीक ठीकच यमक जुळवलं होतं. ढोलूरामला तो म्हणाला, ''चिन्मय करतो आराम म्हणून झाला ढोलूराम''


मग नावावरून असंच काही बाही जुळवणं सुरू झालं. पोरांचा वेळ मस्त जाऊ लागला. गुड्डीचा वाढदिवस होता. तिच्यासाठी सईनं छानपैकी कार्ड तयार केलं. त्यावर गुलाबाचं रंगीत चित्र काढलं. अचानक ढोलूरामला गंमत सुचली. त्यानं रंगीत खडूनं आत लिहिलं –

''गुड्डे गुड्डे
हॅप्पी बड्डे !''

अशा रितीने शब्दांच्या गमतीजमती करत पोरांनी उन्हाळ्याची सुट्टी एकदम हसत खेळत घालवली.

मुलां-मुलींनो, तुम्ही नावांची, शब्दांची अशी गंमत करता का? मला कळवा बरं का. मला वाचायला नक्की आवडेल.

**संपर्क – ९८५०८१७२१०**



**घनश्याम देशमुख**

**जंगलात कोणकोणते प्राणी सिंहाला घाबरून लपून बसलेत ते शोधा पाहू.**

# मामाचा गाव

■ विजय नांगरे

सुट्टी लागते शाळेला अन्, ओढ लागते मला खरोखर
उल्हास मनात भरून येतो, मामाचा तो गाव मनोहर

शेतमळा अन् हिरवाईने, तनमनाचा शीण हरपतो
फळझाडेही मुबलक तेथे, विविध फळांचा स्वाद खुलवतो
रानातली भाजी भाकरी, मधुर वाटे मामाबरोबर

सवंगडी हे इथले सारे, शिकती-शिकवी तत्परतेने
लहान-मोठा नसते काही, चाले ते खेळीमेळीने
द्यावा घ्यावा आनंद कसा, मनात रुजते इथे पुरेपूर

अद्‌भुत जग आजी कथेतून, झोपताना हळूच उलगडते
जादूभरल्या विश्वाची त्या, मोहिनी तन-मनी पसरते
हवे तेवढे खुशाल खेळा, आईचीही नसते कुरकुर

दिवस उगवतो असा एक मग, सुट्टी संपली, जाहीर होते
तशी परतीच्या प्रवासाची, आई तयारी करू लागते
काळ सुट्टीचा असा सुखाचा, संपून जातो किती भरभर?

संपर्क : ९८२२८२०४३०



डॉ. संजय ढोले



# राजूची करामत

रात्रीचे आठ वाजले होते. बाहेर खूप अंधार होता. कनसाई गाव शांतपणे पहुडलं होतं. उन्हाळ्याचे दिवस असल्याने बहुतेक कुटुंब बाहेरच झोपत असत. फिरके गुरुजीही बाहेरच खाटेवर आडवे झाले होते. राजू मात्र त्याच्या अभ्यासिकेत वाचत बसला होता. आजूबाजूच्या घरातील लाईट बंद असल्याने राजूची खोलीच तेवढी ठळकपणे जाणवत होती. अक्का, आईही लवकरच झोपल्या होत्या. राजू नेहमीच जेवणानंतर उशीरापर्यंत अभ्यासिकेत चिंतनासोबतच काही प्रयोगही करीत असे. त्यामुळे त्याच्याकडे फारस कुणी लक्ष देत नसत. या वेळी त्याच्या किरणमामाने काही शास्त्रीय गॅजेट्स पाठवली होती त्याचीच पाहणी

तो करत होता.

कमालीची शांतता होती. दूरवर कुठेतरी कुत्र्यांच्या भुंकण्याचा आवाज येत होता. तेवढाच काय तो व्यत्यय पण जसा वेळ जाऊ लागला तशी कुत्र्यांच्या भुंकण्याची प्रखरता वाढू लागली होती.

त्या अंधारातही गावात हालचाल सुरू झाली होती.. लोकं रस्त्यावर, चौकात दिसू लागले होते. पळत होते. तेवढ्यात गुरुजींच्या पुढ्यात परशा येत म्हणाला. ''गुरुजी ऽऽ गुरुजी ऽऽ'' .. परशाला धाप लागली होती.

''काय रे!... परशा, काय झालं. एवढा पळत का आला?..''

परशाच्या आवाजाने आई, अक्काही जाग्या झाल्या. राजूही अभ्यासिकेतून बाहेर आला होता.

''गुरुजी, दिनूच्या घराला आग लागली. आणि त्याला जोडून मोठी गल्लीही आहे.''

''काय!... आग !! . आणि कधी परशा? गुरुजी आश्चर्याने उद्‌गारले.

''आत्ताच आणि वारा असल्याने चांगलाच जोर धरलाय. ज्वाळा आकाशात झेपावता आहेत.'' परशा घाईने बोलत होता.

''परशा, चल आपल्याला गेलं पाहिजे.'' राजू तातडीने सदरा घालून बाहेर आला होता.

मीही येतो गुरुजी उठत म्हणाले व त्यांनी लागलीच चपला घातल्या होत्या. अक्काही तयार झाली होती.

आत्ताशी सर्व कनसाई गाव उठलं होतं. जागं झालं होतं. दिनूच्या घराला आग लागली, ही बातमी वाऱ्यासारखी पसरली होतीआणि घरातील प्रत्येक जण हांडे - गुंडे घेऊन बाहेर पडले होते. धावपळ उडाली होती प्रत्येक जणाचा ओघ दिनूचे घर होतं.. चौकाच्या हाळीतील पाण्याचा उपसा व्हायला सुरुवात झाली होती. राजूचे मित्र रमेश, सुरेश, कुसुमही हांडे घेऊन हजर झाले होते. रमेश म्हणाला

''राजू!.. चल.. कनसाई गावावरचं हे संकट आहे.. नाहीतर ही आग सर्व गावाला भस्मसात करेल तुलाच काहीतरी करावे लागेल'' रमेश आशेने उत्तरला होता. ''होय! रमेश.. चला आपल्याला गाव वाचवायलाच हवं...'' राजू निश्चयाने म्हणाला रमेश, सुरेश, कुसुम, परशा राजू सोबत निघाले. गुरुजीही पाठीशी झाले.

गावातील प्रत्येक जण सामील झाला होता.. खेडेगावात एक बरं असतं, संकटकाळी सर्व जण एकोप्याने लढा देतात.. कनसाई गावाची हीच खरी शक्ती होती. राजू, गुरुजी दिनूच्या घरासमोर येताच, ते पाहतच राहिले.. आगीनं रौद्र रूप धारण केलं होतं.. ज्वाला आसमंतात जात होत्या. वाऱ्याचा वेग वाढल्याने त्याची झळ दुसऱ्या घरापर्यंत जात होती.. सरपंच रामभाऊ व पोलीस पाटील हरिभाऊ पण हतबल होऊन गुरुजींकडे पाहत म्हणाले..

''गुरुजी!... ही आग कशी आटोक्यात आणायची हो'' हरिभाऊ म्हणाले.

''राजू बाळा ! .. काय करायचं तूच ते सांग, नाहीतर क्षणात ही आग साऱ्या गावात पसरेल...'' सरपंच रामभाऊ हतबलपणे म्हणाले होते.

राजू विचार करीत होता. प्रत्येक गावकरी त्यांच्या परीने पाणी टाकत आग विझवण्याचा प्रयत्न करीत होते पण आग जास्तच फोफावताना दिसत होती.

पुढच्या घरातील माणसं, कुटुंब सामान घेऊन बाहेर पडत होती. राजूची टीमही मदत करीत होती. तशाही परिस्थितीत राजू म्हणाला..

''सगळ्यांनी ऐका!''

सगळे जण थांबले... राजूकडे पाहू लागले. आशेने कारण अशा वेळी राजू काहीतरी मार्ग काढतो हे सर्वांना ठाऊक होते.

''आग आणि वारा एकच वेळी जोर धरत आहे.. आपल्याला शास्त्रीय पद्धतीने आग आटोक्यात आणावी लागेल.. अजूनही वेळ गेलेली नाही.. दोनच घरं आगीच्या भक्षस्थानी आहेत.. पाणी आणि कार्बन डाय-ऑक्साइडचा झोत विझवण्यास महत्त्वाचे असते.. पण आता कार्बन डायऑक्साइड आपल्याकडे नाही.. पण पाण्याच्या थेंबाथेंबाचा वापर आपण खुबीने करू शकतो. तुम्ही सर्वांनी आगीच्या मूळ स्रोतावर

पाण्याचा फवारा मारा. मूळ नष्ट झाले म्हणजे आग पसरणार नाही राजू पुढे झाला व निर्देश करीत पुढे म्हणाला ''या इथे मारा करा. वाऱ्याचा ओघ पूर्वेकडे आहे तो आग थांबवेल चला लवकर कामाला लागा..''

राजूचा आदेश मिळतात सर्व जण त्या दिशेने पाण्याचा मारा करू लागले.. राजूचे हे शास्त्रीय कौशल्य होते.. सर्व जण एकजुटीने प्रयत्न करीत होते. राजू अजूनही विचारातच होता. अजून त्याला काहीतरी करायचे होते. रमेश, सुरेश, कुसुम, परशा, अक्का त्याच्या भोवतीच होते राजूने मोबाईल काढला.. आणि गुगल केले. त्याचे डोळे चमकले. त्याला महत्त्वपूर्ण माहिती मिळाली.. तो आवेगाने म्हणाला..

''रमेश, सुरेश, परशा बादली घ्या आणि माझ्यासोबत नाल्याकडे चला ..''

सगळ्यांच्या चेहऱ्यावर प्रश्नचिन्ह होतं.. पण आता वेळ नव्हती.. सर्वांनी बादल्या हातात घेतल्या.. आणि नाल्याकडे पळू लागले.. राजू म्हणाला

''परशा! .. ही रेती सर्वांनी आपापल्या बादलीत भरा. याचाच मारा आपण आगीवर करू.. या रेतीमुळे आगीला सहाय्य करणाऱ्या ऑक्सिजन वायूचा नायनाट होतो आणि लवकर आग काबूत येते.. चला लवकर.. लागा कामाला..'' राजूही रेती भरू लागला.

सर्वांनी बादलीत रेती भरल्यानंतर आगीकडे धाव घेतली आणि सर्वांनी रेतीचा मारा आगीवर केला.. त्यांने बऱ्यापैकी फरक पडल्यानंतर राजू ओरडला

''निम्म्या लोकांनी रेतीचा मारा करा.. आग लागलीच आटोक्यात येईल.. चला लवकर..''

त्यातील बरेच जण नाल्याकडे धावू लागले.. आणि रेती भरून आगीवर मारा करू लागले.. रेती व पाणी यांच्या संयुगाने आग लागलीच नियंत्रणाखाली आली.. फक्त तीन घरंच जायबंदी झाली होती.. आग शांत झाली होती.. फक्त आता धुराडा उडत होता..

सरपंच रामभाऊ, पोलीस पाटील हरिभाऊ, गुरुजी आणि गावकरी राजूच्या करामतीने आश्चर्यचकित झाले होते.. रामभाऊ पुढे येत म्हणाले

''राजू बाळा ! .. इकडे ये, हे कसं काय केलंस तू.. अशा वेळी तू किती स्थिर राहून विचार करतोस.. ही रेतीची कल्पना कशी सुचली.. सांग ना..''

''काका! .. मी विज्ञान प्रबोधिनीचा विद्यार्थी आहे.. तेथे विचारांना प्राधान्य दिले जाते.. मी हे माझ्या किरण मामाकडूनच हे शिकलो आहे.. ज्या वेगाने आग वाढत होती.. त्यावर फक्त पाणी हा उपाय नव्हता.. मी गुगल बाबाचा आधार घेतला.. तेथे मला शास्त्रीय कारण सापडले. आग नियंत्रण करायची असेल तर त्याच्या भोवतालचा ऑक्सिजन तोडायला हवा. हे फक्त कार्बन डाय-ऑक्साइडने शक्य होते.. ते आपल्या जवळ नव्हते.. पण रेतीच्या माध्यमातून ते मिळविले आणि आपण क्षणात आग काबूत आणली.''

''शाब्बास बेटा'' पोलीस पाटील हरिभाऊंनी राजूला कवेत घेतलं

गुरुजी आणि आईचा ऊर अभिमानाने भरून आला होता.. दिनूच्या कुटुंबीयांनी राजूचे हात पकडले होते.. राजू म्हणाला

''काका!.. तुम्ही मोठे आहात.. मीच नाही तर माझे सवंगडी रमेश, सुरेश, कुसुम, परशा, अक्का यांचाही मोठा सहभाग यात आहे.. हे यश सर्वांचेच आहे.. कारण प्रत्येक गावकरी तळमळीने यात काम करीत होता. तर हे यश सर्वांचे आहे.. आणि मुख्य म्हणजे विज्ञानाचे आहे..''

सर्वांनीच टाळ्या वाजवल्या होत्या.. परशानं आपल्या मजबूत खांद्यावर राजूला उचलून घेतलं होतं.. टाळ्यांचा एकच गजर होत होता.. तेवढ्यात राजूचा मोबाईल वाजला.. तो किरण मामाचा होता. डॉ. किरणला कळालं होतं. राजूने फक्त मोबाईलचा स्विच ऑन केला.. डॉक्टर किरण टाळ्यांचा गजर ऐकतच राहिले होते.. राजूने अजून एक कमाल केली होती.

फिरके गुरुजी व आई, दोघांचाही ऊर आनंदाने भरून आला होता आणि रामभाऊ आणि हरिभाऊ राजूकडे मायेने पाहत होते.

शेवटी राजूचा लढा यशस्वी झाला होता.

**संपर्क- ९३२५६८८८३७**

# चला चित्र रंगवूया...!!!


धनश्री केळकर



डॉ. पंडित विद्यासागर

# निष्कर्ष आणि नियम

मित्रांनो, मागील काही भागांत आपण कुतूहल, निरीक्षण आणि प्रयोग यांचे महत्त्व जाणून घेतले. प्रयोग करून आपण निरीक्षणे नोंदवतो. या निरीक्षणांचा उपयोग निष्कर्ष काढण्यासाठी होतो. विज्ञानात आपण नियम शोधण्याचा प्रयत्न करतो. कारण नियम हा सार्वत्रिक असतो. एकदा नियम माहीत झाला की, त्यासाठी पुनः प्रयोग करावा लागत नाही. उदाहरणार्थ, गुरुत्वाचा नियम. हा नियम असे सांगतो की, दोन वस्तू परस्परांना आकर्षित करतात आणि हे आकर्षण त्यांच्या वस्तुमान आणि दोन्हीतील अंतर यावर अवलंबून असते. एकदा हा नियम माहीत झाला की या जगात घडणाऱ्या अनेक घटना का घडतात, हे आपल्याला समजते. जसे की ग्रह सूर्याभोवती का फिरतात? उंच फेकलेली वस्तू पृथ्वीकडे परत का येते? समुद्राला भरती का येते? माझी सहावीत शिकणारी नात, तन्मयी हिने एक मजेदार प्रश्न विचारला. ती म्हणाली, ''जर चंद्राच्या आकर्षणामुळे समुद्राला भरती येते, तर घरात असलेल्या पातेल्यातील पाणी वर का येत नाही?'' खरं तर, या प्रश्नांचे उत्तर त्या नियमातच आहे. हे आकर्षण बल वस्तुमानावर अवलंबून असते. पातेल्यातील पाण्याचे वस्तुमान खूपच कमी असल्याने निर्माण होणारे बलही सूक्ष्म असणार. त्यामुळे बदल होऊनही तो परिणाम



## एक ओवी विज्ञानाची

दृष्य स्वरूपात दिसणार नाही .

आता आपण निष्कर्ष आणि नियम यातील फरक पाहू या. निष्कर्ष हा एखाद्या निरीक्षण किंवा प्रयोगापुरताच खरा असू शकतो. निष्कर्षाचे नियमात रूपांतर होण्यासाठी तो पुनः पुनः पडताळावा लागतो. निष्कर्ष तोच राहिला तरच त्याचा नियम बनतो. आपण आता, निष्कर्ष आणि नियम याविषयी काही ओव्या पाहू

**विश्लेषणामाजी निष्कर्ष निघाला ।**
**तो पुन्हा पुन्हा पडताळीला ।।**
**निष्कर्ष तोच राहीला ।**
**तरच तो स्वीकारावा ।।**
**नियम असती स्थलकालातीत ।**
**नियम व्यक्ती निरपेक्षित ।।**
**भाषा वंशाने न बंधित ।**
**नियम तो जाणावा ।।**

आता आपण काही निरीक्षणे आणि निष्कर्ष पाहू. आपण रोज सूर्य उगवताना पाहतो. तो पूर्वेला उगवतो आणि पश्चिमेला मावळतो. दिवस आणि रात्र मिळून साधारणपणे २४ तास होतात. यात बदल होत नाही. त्यामुळे सूर्य रोज पूर्वेला उगवतो आणि पश्चिमेला मावळतो असा निष्कर्ष आपण सहजपणे काढू शकतो. आता प्रश्न आहे की, हे सर्वत्र असेच घडते का? तुम्ही म्हणाल घडायलाच हवे, कारण हे रोजचे निरीक्षण आहे. आता आपण, ध्रुव प्रदेशाचा विचार करू. तिथे सूर्य वर्षातून एकदाच उगवतो आणि एकदाच मावळतो. चंद्रावर असणारा दिवस साधारणपणे चौदा दिवसांचा असतो आणि रात्रही तेवढीच. आता शुक्र ग्रहाचा विचार करा. इथे सूर्य चक्क पश्चिमेला उगवतो आणि शुक्र ग्रहावरील दिवस आणि रात्र पृथ्वीवरील २४३ दिवसांएवढी असते. आपण निरीक्षणावरून काढलेला निष्कर्ष आणि प्रत्यक्ष परिस्थिती यात फरक असू शकतो. नियम बनवताना याची काळजी घ्यावी लागते.

नियमाला अपवाद असू शकतो. पदार्थाचे तपमान वाढले की, त्याचे आकारमान वाढते असा सर्वसाधारण नियम आहे. पदार्थाची घनता ही वस्तुमान आणि आकारमानाचे गुणोत्तर असते. त्यामुळे आकारमान वाढल्यास घनता कमी होते. याच कारणामुळे सुई पाण्यात बुडते तर जहाज तरंगते. आता पाण्याचे उदाहरण घेऊ. पाण्याचे तपमान कमी करत गेल्यास त्याचे आकारमान कमी होते. मात्र हेच तपमान चार अंश सेल्सिअसपेक्षा कमी झाल्यास पाण्याचे अपवादात्मक प्रसरण होते. याच पाण्याचा बर्फ झाल्यास तो पाण्यावर तरंगतो. या अपवादात्मक प्रसरणाचे अनेक फायदे आणि तोटे आहेत. नळातील पाण्याचे बर्फ झाल्यामुळे त्याचे आकारमान वाढून नळ फुटण्याचा धोका असतो. पाण्याच्या वरच्या थराचा बर्फ झाला तरी त्याखाली पाणी तसेच राहते. यामुळे जलचर जिवंत राहू शकतात. पाणी समपातळीत राहते हा नियम रोजच्या जीवनात उपयोगी ठरतो. उंच टाकीत साठवलेले पाणी याच नियमानुसार उंच इमारतीत चढते. यापुढे अशा नियमांचा शोध घ्या आणि त्या नियमांना असणारे अपवादही शोधण्याचा प्रयत्न करा. जनमानसांत जे नियम म्हणून स्वीकारले जातात तेही या कसोटीवर तपासून पहा.

**संपर्क : ९४२०४८३४८७**

सेवियर पिरोट्टा

अनुवाद : माधुरी दीक्षित

# पिटुकला उंदीर आणि आळशी मांजर






बर्फ पडणाऱ्या प्रदेशात राहणाऱ्या एका चतुर म्हाताऱ्या मांजरीनं एका पिटुकल्या उंदराशी मैत्री केली. त्या दोघांनी मिळून एक घर बांधलं.

''अरे, सगळ्यात पहिल्यांदा आपल्याला काय काम करायला पाहिजे तर हिवाळ्यासाठी अन्न गोळा करून ठेवायला हवं. बर्फ पडायला सुरुवात झाली की बाहेर आपल्याला काही मिळणार नाही. उपासमारीनं मरायचं नसेल तर आत्तापासून तरतूद करायला हवी.'' मांजर म्हणाली. ''उंदराला ते पटलं. दोघांनी आपल्याजवळचे सगळे पैसे मोजून चरबी भरून ठेवलेलं आणि म्हणून फार मौल्यवान असणारे एक मोठ्ठं भांडं खरेदी केलं.

''या भांड्याला कुठं लपवून ठेवायचं?'' उंदरानं विचारलं. ''चर्चच्या आवारात पुरून ठेवू, चल. तिथून कोणी चोरायची हिम्मत करणार नाही.'' मांजर म्हणाली. मग त्यांनी ते चरबी भरून ठेवलेलं मौल्यवान भांडं चर्चच्या वेदीखाली पुरून ठेवलं.

मग उंदीर आपलं नवीन घर सजवण्यात मग्न होऊन गेला. मांजरीनं काही काम केलं नाही. ती उन्हात मस्तपैकी आराम करत बसली. चरबी ठेवलेल्या मौल्यवान भांड्याची आठवण येऊन तिच्या तोंडाला सारखं पाणी सुटत होतं.

मग ती उंदराला म्हणाली, ''उद्या तू एकटाच घर सांभाळ हं. मला आताच निरोप आलाय की माझ्या चुलत भावाच्या घरी बाळ जन्माला आलंय. त्याच्या बारशाला मला बोलावलं आहे. आता मी नाही कशी म्हणू? पिल्लू तपकिरी रंगाचं जन्मलंय. त्याच्या अंगावर छान पांढरे ठिपके आहेत.''

हे ऐकून उंदीर म्हणाला, ''अरे वा! जरूर जा तू बारशाला.''

दुसऱ्या दिवशी सकाळी मांजर सरळ चर्चमध्ये गेली. ती उंदराला खोटं बोलून आली होती. चर्चमध्ये वेदीखाली लपवलेलं चरबी ठेवलेलं मौल्यवान भांडं तिने बाहेर काढलं, त्यात पंजा बुडवून तिने चरबी चाटली. आहा! काय स्वादिष्ट लागली! आता मांजरीला राहवेना. वरचा सगळा थर चाटून पुसून खाईस्तोवर ती काही थांबली नाही. मग साळसूदपणे भांडं परत लपवून ती निघाली. आपल्या काही मित्रमैत्रिणींना भेटून पार रात्र झाल्यावर घरी परतली.

झोपता झोपता उंदरानं चौकशी केली, ''कसं झालं बारसं? काय नाव ठेवलं पिल्लाचं?''

''वरचं साफ,'' मांजर नकळत म्हणून गेली. कारण अजून तिच्या डोक्यात चरबीचं भांडंच ठाण मांडून बसलं होतं.

''जरा विचित्र नाव आहे ना?'' उंदीर उद्गारला.

''हो ना, आहे खरं.'' मांजर उत्तरली आणि अंथरुणावर पसरली.

एखादा आठवडा गेला असेल नसेल, मांजरीला पुन्हा चरबी खाण्याची फार आठवण येऊ लागली.

ती परत उंदराला म्हणाली, ''अरे, तुला खरं वाटणार नाही कदाचित, पण माझ्या दुसऱ्या बहिणीच्या घरीसुद्धा एक पिल्लू जन्माला आलंय. या पिल्लाच्या गळ्याभोवती सुंदर पांढरा रंगाचा पट्टा आहे. मला परत बारशाचं निमंत्रण आलंय. बहिणीनं इतका आग्रह केलाय ना, नाही कसं म्हणू?''

मांजर निघून गेली. उंदीर घर आवरत बसला.

चर्चपाशी पोचल्यावर मांजरानं चरबी ठेवलेल

भांडं बाहेर काढलं आणि हावरेपणानं गपागप अर्धी चरबी खाऊन टाकली. अहो, काय चवदार लागली! जेव्हा पोटात जागाच उरली नाही तेव्हा कुठं ती खायचं थांबली. भांडं झाकून खड्ड्यात लपवलं आणि आपल्या मित्रमैत्रिणींना भेटायला निघून गेली. रात्री चंद्र उगवेपर्यंत तिनं असा बाहेरच वेळ काढला.

''काय नाव ठेवलं या वेळी नव्या पिल्लाचं? घरी पोचल्यावर उंदरानं विचारलं.

''अर्धं-मूर्ध,'' मांजर म्हणाली.

''अर्धं-मूर्ध?'' उंदराला शंका आली. असलं नाव तर कधी कुणा थोरामोठ्याचं सुद्धा ठेवलेलं ऐकलं नाही बाबा. अगदी शपथ घेऊन सांगतो.

आणखी काही दिवस लोटले आणि मांजरीला चरबीची आठवण येऊन झोप लागेनाशी झाली. शेवटी ती उंदराला म्हणाली, ''चांगल्या गोष्टी नेहमी तीन वेळा घडतात असं म्हणतात. बघ ना, आताच बातमी आलीय की आता माझ्या तिसऱ्या बहिणीनं नुकताच पिल्लाला जन्म दिलाय. मला फार आग्रह केलाय तिनं बारशाला येण्यासाठी. तिला नाही म्हणणं माझ्या जीवावर आलंय.''

'वरचं साफ, अर्धं-मूर्ध,' उंदीर पुटपुटला. ''अशी कशी ही विचित्र नावं? यांच्यावर विश्वास ठेवावा की नाही, काही कळत नाही. पण तू जा.''

पुन्हा एकदा मांजर चर्चकडं धूम पळाली, आणि तिनं चरबी लपवून ठेवलेलं भांडं बाहेर काढलं. अरे म्हणस्तोवर तिनं सगळी चरबी गट्टम करून टाकली सुद्धा. मग आपल्या दोस्तांबरोबर मज्जा करायला ती निघून गेली. घरी जाण्याअगोदर चांगला अंधार पडेपर्यंत, चांदण्या लुकलुकायला लागेपर्यंत तिनं वाट पाहिली.

''आता या बहिणीच्या नव्या पिल्लाचं नाव काय ठेवलंय?'' उंदरानं थेट विचारलं.

काही विचार न करताच मांजर उद्गारली, ''संपलं सगळं.''

''हे तर आत्तापर्यंतचं सगळ्यात विचित्र नाव आहे!'' उंदीर आश्चर्यानं ओरडला. मला आता खात्री पटलीय की ही नावं तूच मनानं तयार केलीत, पण हा उद्योग तू का केला असशील ते काही मला कळत नाही.

हळूहळू दिवस सरले. पानगळ जाऊन कडक हिवाळा आला. बर्फाची चादर सर्वत्र पसरली. थोड्याच दिवसात सगळं काही बर्फाखाली झाकून गेलं आणि आता बाहेर काही खाणं सापडणं मुश्कील झालं. मग उंदीर आणि मांजर चरबी ठेवलेलं मौल्यवान भांडं आणायला चर्चकडे निघाले. अर्थात ते भांडं पूर्वीच रिकामं झालेलं होतं.

भांडं रिकामं पाहून उंदीर संतापाने थरथरू लागला. तो ओरडला, ''पोरांच्या बारशाचं कारण सांगून तू इकडे चर्चमध्ये चरबी खायला येत होतीस तर. मांजरावर कधी विश्वास ठेवायचा नसतो, हे मला पूर्वीच लक्षात यायला हवं होतं. आधी काय तर' वरचं साफ', नंतर काय तर 'अर्धं-मूर्ध' आणि आता तर .....''


''संपलं सगळं! मांजर गरजली आणि तिनं झडप घालून झटक्यात उंदराला खाऊन टाकलं. वा, वा! काय चवदार लागला!

***(Grimm's Fairy Tales या पुस्तकातील सेवियर पिरोट्टा यांच्या Cat and Mouse in Partnership या मूळ कथेच्या 'छोटा चूहा और आलसी बिल्ली' या हिंदी अनुवादित कथेवरून करण्यात आलेला साभार मराठी अनुवाद)***

**संपर्क - ९४२३५८६३४८**

# दिल्याप्रमाणे प्राण्यांचे चेहरे काढा व रंगवा.

घनश्याम देशमुख



# झाडाच्या त्रिपदी

■ हेमंत गोविंद जोगळेकर

गदगदा हसतंय झाड
करतोय गुदगुल्या
वारा द्वाड

✪ ✪ ✪

पवनचक्की दमली
थांबली
वाऱ्याला सुट्टी मिळाली


✪ ✪ ✪

जमिनीवरचं पान
वाऱ्यानं उडवलं
पुन्हा झाडावर नेऊन ठेवलं

✪ ✪ ✪

करून घेऊ वाटणी
डोंगरावरच्या झाडांवर
ढगांची मालकी

✪ ✪ ✪



झाडाचे गळून पडलेलं पान
सांगतंय वर पहात
घाबरू नका मारा उडी

✪ ✪ ✪

एकटं झाड
वारा काढतोय
घुसळून घुसळून

✪ ✪ ✪

इतका बहर
वाकलंय
म्हातारं झाड

✪ ✪ ✪

धपकन पडलं
पाण्यामध्ये
झाडाचं प्रतिबिंब

✪ ✪ ✪

डोईतलं फूल कसं दिसतंय
पाहण्यासाठी तळ्याकाठी
झुकलंय झाड

✪ ✪ ✪

झाडांनी खोचल्येत
आपली फुलं
आपल्याच डोक्यात

✪ ✪ ✪



आकाश मास्तरांनी विचारला
प्रश्न इतका सोपा
सगळ्या झाडांचे हात वर

✪ ✪ ✪

मी आत्ता पाहिली
पण केव्हापासून ही
जुई फुलून राहिली

✪ ✪ ✪

केळीचं झाड
लाजून चूर
लपवतंय पानामागे केळफूल


✪ ✪ ✪


('तरंगत तरंगत' मधून साभार)
संपर्क – ९४२३५८२५६५

## इ. ८ वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'बालभारतीच्या'
## मराठी व इंग्रजी माध्यमातील दर्जेदार व गुणवत्तापूर्ण स्वाध्यायपुस्तिका







**ठळक वैशिष्ट्ये**


- प्रचलित पाठ्यपुस्तकावर आधारित
- स्वयं अध्ययनास चालना देणारी
- लेखनाचा अधिकाधिक सराव
- प्रश्नप्रकारांमध्ये वैविध्य
- विषयांचे दृढीकरण
- जिज्ञासावर्धक आणि विचारप्रवर्तक प्रश्न
- पाठ्यांशावर आधारित परंतु पाठ्यपुस्तकापलीकडील ज्ञानाच्या वाढीला चालना देणारे प्रश्न
- महाराष्ट्रातील शिक्षण तज्ज्ञ व अनुभवी शिक्षकांचा लेखन सहभाग
- अल्प किंमतीत दर्जेदार व गुणवत्तापूर्ण अभ्यास साहित्य











**नोंदणीकृत विक्रेते व शैक्षणिक संस्थांना २०% सवलत**

वरील स्वाध्याय पुस्तके खरेदीकरिता मंडळाच्या खालील विभागीय भांडार व्यवस्थापकांशी संपर्क करावा

**विभागीय भांडारे** पुणे–९४२३००५०७०, मुंबई (गोरेगाव)– ९४२३००५०७१, छत्रपती संभाजीनगर– ९४२३००५०७३, नागपूर– ९४२३००५०७२, नाशिक–९४२३००५०७४, लातूर– ९४२३००५०७५, कोल्हापूर– ८७९९९०९६५६, अमरावती ९४२३००५०७७, पनवेल– ९४२३००५०७८

# पोलीस दिदी

■ डॉ. प्रदीप आवटे

खाकी पॅन्ट, डगला खाकी
रुबाबदार टोपी
पोलीस झाले मी बघा
राह्यलं काय बाकी

मला पाहून घाबरले
सगळे चळाचळा
'पोलीस दिदी आली आली
दूर पळा पळा'

बाबा म्हणाला, बाप रे बाप
ही पोलीस सगळ्यात भारी
हिची नजर, हिचा तोरा
ही वाटते किती करारी !

मी आहे पोलीस दिदी
एकदम एकदम कडक
चुकलात काही, चोरलंत काही
तर बेड्या घालीन तडक

थरथर कापत दादा म्हणाला,
चुकलं माझं पोलीस दिदी, करून टाका माफ
मोठी पेटी भरून पैसे देतो
हिशोब आपला साफ !

दंडुका उगारत ओरडले मी,
लाच देतो मला
थांब आता शिकवते
चांगलाच धडा तुला !

मामा जवळ येऊन म्हणे,
पोलीस दिदी, पोलीस दिदी,
तुम्ही दिसता किती क्यूट
मला एक पापी द्या ना
तुमचा गुस्सा करा म्युट

पोलीसाची पापी घेते
ममी आमची वेडी.
हात करं पुढं आता
तुला घालते बेडी !

बेड्या घाला, मला तुम्ही
एक, दहा, शंभर, हजार
बेडीतच राहू दे तुमच्या
होऊ नका तुम्ही पसार !

असं म्हणत म्हणत मला
ममाने मारली घट्ट मिठी
तिच्याच बेडीत अडकले मी
पोलीस दिदीची झाली सुट्टी !

संपर्क – ९४२३३३७५५६



अभिजित पेंढारकर



# रायगडाची सहल

''निनाद, ए निनाद...अरे बाळा, ऊठ!'' आजी उठवायला आली, तेव्हा निनाद कसाबसा आळोखेपिळोखे देत उठला. तरी डोळे मिटलेलेच होते.

''अरे, सुट्टी लागलेय म्हणून किती वेळ झोपायचं? दहा वाजले आता! पाटीलकाकांच्या दुकानात मदतीला जाणारेस ना तू आजपासून?'' आजी म्हणाली.

''हो गं, जाणार होतो, पण....''

''पण काय झालं?''

''मूड नाहीये माझा!'' तेवढ्यात तिथे आलेली मिताली

म्हणाली आणि निनादनं डोळे उघडून किंचित रागानं तिच्याकडे बघितलं.

''माझी चेष्टा करू नकोस. जा तू!'' निनाद फिस्कारला.

''हं...म्हणजे ती तुझी चेष्टा करतेय, हे कळतंय, पण वळत नाहीये तर. सारखा कसा रे मूड नसतो तुझा?'' आजी थोडी रागावून म्हणाली. सोसायटीतले पाटीलकाका सोसायटीच्या जवळच आंब्यांच्या विक्रीसाठी स्टॉल लावत असत. तिथे दिवसभर गिऱ्हाइकं भरपूर असल्यामुळे त्यांना मदतीला कुणीतरी हवं होतं. पाटीलकाकांचा मुलगा प्रणव हा सुद्धा निनाद आणि मितालीच्याच वयाचा. दुकानात मदतीची गरज आहे, हे समजल्यावर मितालीनं स्वतःच निनादबरोबर मदतीला येईन, असं सांगून टाकलं. आदल्या दिवशी निनादने तसं कबूलही केलं होतं, पण आज सकाळी उठल्यावर मात्र काही केल्या त्याचा मूड होईना. निनादची ही सवय हल्लीच्या काळात थोडी वाढलीच होती. कुठलीही गोष्ट करायची, तरी त्याला कंटाळाच यायचा. कुणाकडे मदतीला जायचं असेल, पोहायला, फिरायला, अगदी कुठे छानसं खायला जायचं असेल, तरी मूड नाहीये म्हणून तो जाणंच टाळायचा. अभ्यासात तो हुशार होता, पण यंदा अभ्यास करायचा मूड न लागल्यामुळे त्याला पेपरही अवघड गेले होते. आईबाबांना तर चिंताच लागली होती, की हा असाच आळशीपणा करत राहिला, तर ह्याचं पुढे कसं होणार?

''मी सांगतो याच्यावरचा रामबाण उपाय!'' केतनमामा म्हणाला. निनादचा स्वभाव, त्याच्या आवडीनिवडी हे सगळं आईबाबांपेक्षाही जास्त केतनमामाच जास्त ओळखत होता. लहानपणापासून त्यानं निनादबरोबर भरपूर वेळ घालवला होत, त्याचे लाड केले होते, त्याला साहसी खेळ शिकवले होते, अनेक ठिकाणी फिरवलं होतं. आता तेरा-चौदा वर्षांचा झाल्यावर मात्र निनाद थोडा 'मूडी' झाल्याचं केतनमामाच्याही लक्षात आलं होतं. म्हणूनच तो काहीतरी निमित्त काढून घरी दाखल झाला होता. यंदाच्या सुटीत निनादला एक साहसी खेळांच्या शिबिराला पाठवण्याचं आईनं ठरवलं होतं, पण तिथेही जायला निनादनं नकार दिला. कारण तेच - 'मूड नाहीये माझा.'

''आपण या सुट्टीत रायगडावर जाणार आहोत!'' केतनमामानं जाहीर केलं.

''रायगड?? वॉव....!! मज्जा येणार...खूप धमाल करायची!'' पूर्वीचा निनाद असता, तर नक्कीच असं म्हणाला असता. पण हा निनाद आधीचा राहिलेला नव्हता.

''रायगड? एवढ्या लांब जायचं? बापरे!'' अशी प्रतिक्रिया त्यानं दिली आणि आई, बाबा, आजी सगळ्यांनीच डोक्याला हात लावला. केतनमामा मात्र कूल होता.

''तू माझ्याबरोबर कुठलीही तक्रार न करता आलास ना, तर माझ्यातर्फे तुला गिअरची नवीन सायकल!'' मामा म्हणाला आणि निनादचे डोळे एकदम चमकले. गिअरची नवीन सायकल घ्यायची, असा हट्ट त्यानं बरेच दिवस आईबाबांकडे चालवला होता, पण त्यांनी त्यासाठी त्याला थोडे दिवस थांब, असं सांगितलं होतं. त्यामुळे मामानं अचानक दिलेली ही ऑफर त्याला नाकारणं जडच गेलं. शेवटी कसाबसा तो रायगडाच्या सहलीला यायला तयार झाला.

''या शनिवारीच आपण निघूया. मूड नाहीये वगैरे कारणं सांगायची नाहीत. चार दिवस मस्त भटकून येऊ.'' मामानं जाहीर केलं.

''आता जरा जागेवरून ऊठ आणि बाथरूमला जाऊन ये. मघापासून चुळबूळ करतोयंस. की त्यासाठीही मूड नाहीये तुझा?'' मामा सगळ्यांसमोर मोठ्यानं म्हणाला आणि निनाद त्याच्याकडे जरासा रागानेच बघत, चरफडत बाथरूमकडे पळाला. सगळ्यांना हसू आवरेना.

मामाकडून नवीन सायकल मिळणार म्हणून निनाद त्याच्याबरोबर फिरायला जायला तयार झाला होता खरा, पण बॅग भरणं, बूट शोधून ठेवणं, इतर तयारी, यासाठीही त्यानं शक्य तेवढा कंटाळा केला. आईनं जसं आठवेल तसं एकेक सामान भरून ठेवायला सांगितलं, की दर वेळी निनादचं एकच उत्तर - मूड नाहीये माझा. नंतर भरतो. शेवटी अगदी आदल्या रात्रीपर्यंत एकेक वस्तू जमवत कशीबशी बॅग भरून झाली. सकाळी आपण लवकर उठलो नाही, तर मामा तोंडावर पाणी टाकून आपल्याला भिजवेल, ही खात्री असल्यामुळे निनाद धडपडत उठला. तरी अंघोळ करायच्या ऐवजी नुसते हातपाय धुऊन चालतंय, अशी सवलत त्यानं घेतली आणि अंघोळ टाळली. मिताली आणि प्रणव हे सोसायटीतले मित्रही त्यांच्याबरोबर आले होते. सगळे मामाच्या गाडीने महाड स्टँडपर्यंत पोहोचले आणि नेमकी तिथेच गाडी बंद पडली. तरी बरं, मामाच्या मित्राच्या घराच्या अगदी दारातच गाडी बंद पडली होती. मामाने सगळ्या मुलांना गाडी ढकलायला सांगितलं, पण

निनादनं तिथेही थोडा कंटाळाच केला. तिथे मित्राच्या घराच्या अंगणात मामानं गाडी लावून टाकली.

''आता पुढे कसं जायचं?'' मितालीनं विचारलं.

''चालत!'' मामा म्हणाला आणि निनादचा चेहरा बघण्यासारखा झाला.

''चालत...?'' त्यानं विचारलं.

''हो. फारतर पंचवीस किलोमीटर अंतर असेल! आज निघालो, तर परवापर्यंत पोहोचू!'' मामा म्हणाला आणि सगळीच मुलं एकमेकांकडे गोंधळून बघायला लागली. मामाच्या चेहऱ्यावर मिश्कील हसू होतं.

''चला, आपली बस लागली असेल!'' मामा त्यांच्याकडे बघत म्हणाला आणि सगळ्यांना एकदम हायसं वाटलं.

''इथून चालत जायला लागलात, तर आईस्क्रीमसारखे वितळून जाल उन्हात!'' मामा म्हणाला आणि मुलांना हसू आलं. बस लागलेलीच होती. आत बसल्यावर एक उत्साही मुलगा त्यांच्या पुढच्याच सीटवर येऊन बसला. साधारण मुलांच्याच वयाचा होता. हातात एक टोपली, थोडे मळलेले कपडे, डोक्याला फेट्यासारखं काहीतरी गुंडाळलेलं.

''काय रे त्या टोपलीत?'' मामानं विचारलं.

''लोणचं आणि पापड!'' मुलगा म्हणाला. मामानं त्याच्याशी काही गप्पा मारल्या. या मुलाचं नाव विराज होतं. त्याची आई घरगुती लोणची आणि पापड तयार करते आणि सुटीच्या दिवशी विराज ते घेऊन स्वतःच रायगडावर जातो, तिथे दिवसभर थांबून पापड, लोणची विकून पुन्हा बसने घरी परत येतो, असंही त्यांना गप्पांमधून समजलं. बस शेवटच्या स्टॉपला थांबली आणि सगळे प्रवासी उतरले. निनादही उतरला आणि समोर बघून त्यानं विचारलं, ''हे काय, रोप वे कुठाय?''

''गडावर चढाईचे सगळे दोर शत्रूंनी कापून टाकले आहेत, युवराज! आज आपल्याला 'रोप वे'ने गडावर जाता येणार नाही!!'' मामानं ऐतिहासिक नाटकात काम केल्यासारख्या आवेशात हे वाक्य म्हटलं आणि मिताली, प्रणव, विराज, सगळ्यांनाच हसू आलं. निनाद मात्र गोंधळून गेला होता.

''अरे, रोप वे दुसऱ्या बाजूला आहे. आपण इथे पायथ्यापाशी उतरलोय. इथून चढून आपल्याला गडावर जायचं आहे.'' त्याचा गोंधळलेला चेहरा बघून मामानं खुलासा केला. तेवढ्यात मधल्या प्रवासात वेगवेगळ्या ठिकाणी बसमध्ये चढलेल्या मावश्या, आज्या आपापल्या टोपल्या घेऊन भराभर गड चढायला लागल्या होत्या. काही वयस्कर मंडळीही होती. छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाचा जयघोष करून मामानं पुढे चालायला सुरुवात केली आणि मिताली, प्रणव आणि निनाद ही वानरसेना मागून निघाली. तरी निनाद सगळ्यात मागेच होता. बऱ्याच पायऱ्या चढून गेल्यानंतर मुलं दमली आहेत, हे मामाच्या लक्षात आलं. त्यानं सगळ्यांना लिंबू सरबत पिण्यासाठी एका झाडाखाली लावलेल्या छोट्याशा स्टॉलपाशी नेलं. एका म्हाताऱ्या आजोबांचा तो स्टॉल होता. ते आणि त्यांची बायको, अशी दोघंच तिथे सगळ्यांना सरबत देत होते. मामाच्या ओळखीचे असावेत. मामानं त्यांच्याशी काही वेळ गप्पा मारल्या. सगळी मुलं तिथलं झकास लिंबू सरबत पिऊन एकदम ताजीतवानी झाली.

''हे आजोबा इथे रोज हेलिकॉप्टरने येतात बरं का... इथे मागच्या बाजूला झाडावर टांगून ठेवतात त्यांचं हेलिकॉप्टर.'' मामा मुलांकडे बघून गमतीने म्हणाला. मुलांना हसू आलं.

''काय निनादराव, मूड येतोय का?'' मामानं निनादकडे बघत विचारलं. निनाद आता पुढच्या पायऱ्या चढून जायला थोडासा कंटाळलाच होता. मामानं काहीबाही गोष्टी सांगत, गप्पा मारत त्याला पुढे नेलं. मिताली, प्रणव तर अगदी उत्साहात होते. मघाशी त्यांच्याबरोबर बसमधूनच आलेला तो मुलगा – विराज तो तर कुठच्या कुठे निघून गेला होता. मजल दरमजल करत मंडळी शेवटी गडाच्या माथ्यावर पोहोचली. दमून गेली होती. आता गार काहीतरी मिळावं, असं वाटत होतं.

मामा म्हणाला, ''कोल्ड्रिंक प्यायचंय का?''

निनादने मोठ्या आवाजात ''हो'' म्हणून लगेच होकार देऊन टाकला. मामानं तिथेच एका बाजूला बसलेल्या आजींकडे बोट दाखवलं. आजींजवळ जाऊन काहीतरी सांगितलं आणि आजींनी मान डोलावून पटकन त्यांच्या टोपलीतली दह्याची चार मडकी काढली, त्याचं ताक करून दिलं.

''हे घ्या तुमचं कोल्ड्रिंक!'' मामाने समोर ग्लास धरत मुलांना म्हटलं. निनादने थोड्या नाराजीनेच तो ग्लास तोंडाला लावला, पण खऱ्याखुऱ्या कोल्ड्रिंकपेक्षाही ते ताक गार आणि मस्त असल्याचं त्याला पहिल्याच घोटात

जाणवलं आणि त्यानं ते गटकन संपवून टाकलं. आजींकडे आणखी एक ग्लास मागितला, तोही त्यानं मटकावून टाकला. मामा गालातल्या गालात हसत त्याच्याकडे बघत राहिला.

''ह्या आजी मघाशी एका गावात आपल्या बसमध्ये चढल्या आणि आपल्याबरोबरच उतरून आपल्या पुढे चालत आल्या, आठवतंय का, निनादराव?'' मामानं आठवण करून दिली, तेव्हा निनादलाही ते जाणवलं. तिथे थोडी विश्रांती घेऊन सगळे माथ्यावर पोहोचले. छत्रपती शिवाजी महाराजांच्या समाधीपाशी जाऊन सगळ्यांनी दर्शन घेतलं. त्यांना वंदन केलं. मेघडंबरी, जगदीश्वराचं मंदिर, टकमक टोक, सगळीकडे मामानं त्यांना फिरवलं. गडावर गेल्यावर मात्र निनादचा चेहरा नाही म्हटलं तरी खुलला होता. मोकळी हवा, भारावलेलं वातावरण, मामाकडून ऐकायला मिळणाऱ्या ऐतिहासिक गोष्टी, याचा आनंद घेत होता. गडावर जेवायची आणि राहण्याची सोयही मामानं आधीच करून ठेवली होती. दुसऱ्या दिवशी पहाटे उठून सूर्योदय बघायला जाण्यासाठीही निनाद अगदी उत्साहानं तयार झाला. उरलेली ठिकाणं त्यांनी बघितली. दुपारी भरपेट जेवणही झालं.

''काय मग, कसा वाटला महाराजांचा रायगड?'' मामा म्हणाला.

मुलांना प्रचंड आवडलाच होता.

''सगळ्यात जास्त भक्कम आणि मजबूत, शत्रूलाही जिंकण्यासाठी अवघड असा किल्ला, म्हणून महाराजांनी रायगड ही आपली राजधानी म्हणून निवडला.'' मामानं सांगितलं. गडाची आणखीही माहिती दिली. इथे बांधकाम करताना, युद्धासाठीचं साहित्य, दारूगोळा, तोफगोळे वगैरे आणताना सगळ्यांनाच किती कष्ट पडले असतील, हे मुलांच्या लक्षात आलं. स्वतः शिवाजी महाराजांनीही स्वराज्यासाठी किती मेहनत घेतली, किती संघर्ष केला, हे सगळं या निमित्तानं पुन्हा आठवलं.

''अजूनही आपल्या सगळ्याच गडकिल्ल्यांचं महत्त्व टिकवण्यासाठी, तिथल्या ऐतिहासिक गोष्टी जपून ठेवण्यासाठी कितीतरी संघटना, संस्था मेहनत घेतात. कष्ट करतात. आसपासच्या गावातून माणसं इथे पाण्यापासून दही, ताक, खाणंपिणं, जेवणापर्यंत सगळ्या वस्तू इथे पुरवतात. त्यासाठी रोज गड चढून येतात. त्यांनी 'मूड' नाहीये, सांगितलं, तर गडावर येणाऱ्यांचे किती हाल होतील!'' मामा म्हणाला. मामा हे कशासाठी सांगतोय, ते निनादच्या लक्षात आलं. ''मामा, खूप मजा आली इथे येऊन!'' एवढंच तो म्हणाला. संध्याकाळ व्हायला आली होती. पायथ्यापासून निघणारी शेवटची बस त्यांना पकडायची होती. आता गडावरून उतरायला हवं होतं. तेवढ्यात विराजही तिथे आला. त्याचा चेहरा मात्र थोडा उदास दिसत होता. आज गडावर त्याच्याकडचं सगळं साहित्य खपलं नव्हतं. निनादनेच मग मामाला सुचवलं आणि मामाने त्याच्याकडून तीन चार प्रकारची लोणची विकत घेतली, तेव्हा विराजही खूश झाला.

''चला, आता गड बघून झाला. उतरताना रोप वेने जाऊया ना?'' मामा म्हणाला.

''नको मामा. मस्त पायऱ्या उतरतच जाऊया. मजा येईल.'' निनादनं लगेच उत्तर दिलं, तेव्हा मामासकट सगळ्यांना आश्चर्य वाटलं.

''का रे, असं का?'' मितालीनं विचारलं.

''नको. रोप वेमधून पुन्हा केव्हातरी. आज मूड नाहीये!'' निनाद हसत म्हणाला. त्याच्या बोलण्याचा अर्थ लक्षात येऊन मग सगळेच हसायला लागले.

**संपर्क – ९८८१०९८०७०**

**'किशोर' हे मासिक मालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती यांचेकरिता, मुद्रक व प्रकाशक विवेक उत्तम गोसावी यांनी मे.प्रिंट प्लस प्रा.लि., गाळा नंबर १ ते १०, ई–१, जय जलाराम इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स, व्हिलेज पिंपलास, ता. भिवंडी, जि. ठाणे ४२१३११. येथे छापून 'बालभारती', सेनापती बापट रोड, पुणे ४११००४ येथे प्रसिद्ध केले. * संपादक – कृष्णकुमार पाटील.**

**'Kishor' monthly publication is owned by Bureau of Text Book Production and Curriculum Research, Balbharati, Printed and Published by Vivek Uttam Gosavi, Printed at M/s. Printplus Private Limited., G-1 to 10, E-1, Jai Jalaram Industrial Complex, Village Pimplas, Taluka Bhiwandi, Dist-Thane 421311. and Published at Balbharati, Senapati Bapat Road, Pune-411004. * Editor - Krishnakumar Patil**

मृणालिनी वनारसे



# जंगली बापू

आमचं शहर इतर शहरांसारखंच गजबजलेलं आहे. उंच इमारती, रस्ते, बाजार इथे सारं काही आहे आणि त्यात सतत भरच पडते आहे. पण आमच्या शहरात रस्त्याच्या कडेनं, बागांमधून, इमारतींभोवती, घरांसमोर, सोसायट्यांच्या आवारात झाडंही आहेत. एखाद्या इमारतीच्या गच्चीवरून शहराकडे पाहिलं तर वाटेल, केवढी हिरवाई आहे! पण हिरवाई म्हणजे काय? झाडं? झाडं तर आहेतच. पण त्यांच्या जोडीला काय काय असतं! झुडपं, वेली, गवतं आणि असं बरंच काही. आपण गाडीतून किंवा गाडीवरून भर्रकन जाताना आपल्याला काय दिसणार! कधी सिग्नलला एखादा फुललेला शोभिवंत वृक्ष नजर वेधून घेतो, पण तेवढाच. कधी गाडीवर कसलीशी फळं पडून गाडी 'घाण' होऊन जाते आणि आपण करवादतो, कुठलं हे झाड! कदंब! कुणीतरी सांगतं. असेना का कुठलंही, त्याचा जरा वैतागच आहे! आणि नारळाच्या झाडाखाली तर पाटीच असते, 'येथे गाडी उभी करू नये, नारळ पडण्याचा धोका!' गेली जागा! शहरात झाडं म्हणजे असून अडचण आणि नसून खोळंबा!

पण आमच्या शहराची गोष्ट थोडी वेगळी आहे. आमच्या शहरात बापू आहेत आणि म्हणून आमच्या शहरात झाडांकडे कुतूहलानं आणि प्रेमानं बघणारी माणसं आहेत. ते बघा, एक नव्वदीचे गृहस्थ एका छानश्या झाडाखाली उभं राहून माहिती देताहेत. 'हा आहे अर्जुन वृक्ष. त्याचं शुभ्र खोड बघा. पालवी बघा. आसमंतात त्याच्या तुऱ्यांचा एक मंद दरवळ आहे. कळतोय ना? हा वृक्ष कसा आहे? नदीसर्ज! म्हणजे नदीकाठी वाढणारा. संस्कृत नाव आहे. नदी आणि अर्जुनाची अशी जोडी आहे. आणि विशेष म्हणजे फार गुणकारी औषधी वृक्ष आहे.' ते गृहस्थ म्हणजे बापू अर्थात आमचे श्री. द. महाजन सर. बापू अगदी रंगून सांगत असतात.. त्या क्षणी जणू ते अर्जुनमय झालेले असतात. आणि ऐकणारे प्रसन्नपणे मान डोलावत असतात, तेही अर्जुनमय होऊ लागतात.

बापू शहरात 'वृक्ष परिचय कार्यक्रम' करतात. म्हणजे उत्सुक वृक्षप्रेमींना झाडांची माहिती करून देतात. चालत चालत जाऊन झाडं बघायची. त्यांची ओळख करून घ्यायची. कधी झाडाला भेट देणारे पक्षी बघायचे तर कधी झाडाखाली पडलेल्या बिया गोळा करायच्या. त्या पुढे नर्सरीत अथवा घरी रोपे करण्यासाठी न्यायच्या. तीनचार तास माणसं चालतात, वृक्षमित्र जोडतात. बापू समाधानी होतात. शहरात अनेक माणसं वृक्षांशी मैत्री करू शकली आहेत ती बापुंमुळेच.

बापू वनस्पती विज्ञान म्हणजे बॉटनीचे विद्यार्थी आणि नंतर अध्यापक. जंगलांच्या अभ्यासासाठी त्यांनी किती जंगलं, दऱ्याखोऱ्या पालथ्या घातल्या, समुद्र किनारे पाहिले त्याची गणती नाही. त्यांनी अनेक वर्षं विद्यार्थ्यांना बॉटनीची गोडी लावली. कॉलेजातले शिकवणे थांबले पण बापूंचे शिष्य तयार होतच राहिले. अगदी सामान्य माणसे, ज्याला कुणाला वनस्पतींविषयी प्रेम आहे त्याला बापू भरभरून सांगणार. हे पारंब्या असलेलं झाड कोणतं? वड तर नाही वाटत? असं कुणी विचारलं की बापूंचे डोळे चमकतात. आणि मग ऐकणारा ऐकू लागतो. 'अरे ही तर बटाधारी सुंदरी, म्हणजे आपला नांद्रुक. फार गुणवान वृक्ष आहे.'

''बापू, तुम्हांला वनस्पतींविषयी असं प्रेम, असं कुतूहल नेहमीच होतं का?'' त्यांना कधी कुणी विचारतं. ते सांगतात, 'सुरुवात माझ्या लहानपणी आमच्या लहानशा परसबागेपासून झाली. तिथे लावलेली झाडं, झुडपं विशेषतः वेली मी मन लावून बघत होतो. शाळेतून घरी आलो की आधी परसबागेकडे पळायचो. तिथली बारीकसारीक गोष्ट टिपायला मला भारी आवडायचं.'

तेव्हांची एक गोष्ट. परसबागेत वाढणारा घेवडा आणि घोसाळ्याची वेल बापूंच्या विशेष आवडीची होती. वेलांची दररोज होणारी वाढ बघणं म्हणजे किती आवडीची गोष्ट!. घोसाळ्याची तळहाताएवढी पंचकोनी कोवळी पानं पाहायची, घेवड्याची त्रिदली पानं पाहायची यात बापूंचा कितीतरी वेळ मजेत जाई. शेंगा तोडण्याचं काम मोठ्या काळजीपूर्वक करायचं असे. शेंगा तोडताना फुलं कळ्यांना धक्का लागून त्या गळून पडता कामा नयेत. फिकट जांभळ्या गुलाबी रंगाच्या फुलांवर उडणारे भुंगे, पतंग बघत बसण्याचा आनंदही काही औरच. हे वेल दोरीभोवती, गजाभोवती, खांबाभोवती आपोआप गुंडाळून कसे काय वर जातात याचं त्यांना कोण कुतूहल वाटत असे. दिवसा तर ही क्रिया होताना दिसायची नाही. मग हे कधी होत असलं पाहिजे??

बापूंनी प्रत्यक्ष बघायचं ठरवलं. त्या वेळी बापू म्हणजे तेव्हाचा तो छोटा मुलगा अकरा-बारा वर्षांचा होता. रात्रीची जेवणं झाली, अभ्यास झाला. तो झोपायच्याऐवजी वेलापाशी जाऊन बसला. वेळच्या नवीन आलेल्या फांदीच्या शेंड्याजवळ बोट धरून हालचाल न करता बसून राहिला. पहाटे चार-साडेचारच्या सुमारास त्याच्या लक्षात आलं की आपल्या बोटाभोवती विळखा पडायला सुरुवात झालेली आहे. थोड्या वेळानं पकड घट्ट व्हायला लागल्यावर त्यानं ते बोट सोडवून घेतलं आणि जाऊन झोपला. सकाळी उठायला उशीर झाला. रात्रीची करामत आईवडिलांना सांगितल्यावर ते काही रागावले नाहीत पण त्यांना काही विशेष वाटलंही नाही. शाळेतही तेच. पण त्यांचे एक शिक्षक मात्र आपल्या विद्यार्थ्याचं हे निरीक्षण ऐकून खूश झाले आणि त्यांनी त्याला सगळ्या वर्गासमोर आपली ही गोष्ट सांगायला सांगितली. बापूंचा उत्साह वाढला. पुढे शेजारच्या एका मुलाने काहीतरी खोडी म्हणून बापूंचे आवडते वेल ब्लेडने छाटून टाकले. किती दुःख! काही दिवस अन्नही गोड लागेना.

पण बियांतून झाड पुन्हा येतं, वाढतं.. किती मोठी गोष्ट! बापूंनी पुन्हा बिया लावल्या. वेल तरारले. पण पहिल्या सारखे जोमानं वाढले फुलले नाहीत. हेही एक निरीक्षणच. त्या मुलानं यातलं काय पाहिलं माहीत नाही पण बापूंची निरीक्षणे मात्र वाढत गेली. 'घर परिसर, शाळा, वाटेतील झाडे झुडपे इथूनच सुरू झाला मी जंगली होण्याचा प्रवास.' बापू सांगतात. स्वतःला 'जंगली बापू' म्हटलेलं त्यांना आवडतं.

बापू चालता चालता रानवा निरखत राहतात. हळूहळू निरीक्षणांचे तुकडे एकमेकांशी जुळत राहतात, बापूंना झाडझाडोरा कळत राहतो. अशीच एक गोष्ट गणेर किंवा सोनसावर या झाडाची. (या झाडाला सोनसावर हे नाव बापूंनीच दिलं. या झाडाची फुलं काटेसावर नावाच्या झाडासारखी दिसतात. काटेसावरीला लाल फुलं. गणेरीला सोनेरी फुलं. म्हणून असं नाव.) हे झाड आमच्या शहरातल्या टेकड्यांवर, नेमकं सांगायचं तर, टेकड्यांच्या

माथ्यावर दिसून येतं. वर्षभर हे झाड तिथे आहे हे कुणाच्या लक्षातही येणार नाही. हिवाळ्याच्या शेवटी किंवा उन्हाळ्याच्या सुरुवातीला या झाडाची शोभा बघावी. सगळी टेकडी त्या वेळी ओकीबोकी दिसते. पण सोनसावर मात्र फुलांनी बहरलेली असते. झाडाच्या शेंड्याकडे सोनेरी रंगाची मोठी मोठी फुलं लगडलेली असतात. माणसं त्यांच्याकडे बघतच राहतात. त्यांचे असंख्य फोटो काढतात आणि विसरून जातात. बापूंना मात्र एक गोष्ट जाणवली. ही झाडं टेकडीच्या माथ्यावरच फक्त दिसतात. उतारावर सुद्धा नाही. रस्त्याकडेने नाही, बागेत नाही, नदीच्या काठाने नाही. कुठे कुठे नाही. झाडाने जणू आपली जागा निश्चित केली आहे.

दुसरीकडे रोप लावून बघावे. बापूंनी विचार केला. पण रोप आधी तयार करावे लागेल. ते काही कुठल्या नर्सरीत मिळत नाही. कारण अजून कुणी तसे फार प्रयत्नच केलेले नाहीत. रोप कसं तयार करावं? बियांपासून? त्यासाठी बिया जमा कराव्या लागतील. फुलं गाळून पडली की झाडावर वांग्यासारखी बोंडं दिसायला लागतात. यात मऊ कापूस असतो आणि त्यात लपेटलेल्या बिया. फळ उकलतं आणि बिया वाऱ्यावर उडत निघतात. त्याच्या आत त्या पकडायला हव्यात. बापू फळ पिकायच्या आसपास लक्ष ठेवून टेकडीवर गेले आणि त्यांनी बिया गोळा केल्या. आता त्या घरी ट्रेमध्ये रुजवायच्या. 'पण सगळ्या एकदम नाही. अर्ध्या ठेवून द्यायच्या.' बापू गोष्ट सांगितल्याप्रमाणे सांगतात. उगवून तर आल्या. बऱ्यापैकी सगळ्या रुजल्या. पण इंच दोन इंच वाढून रोपं मरून गेली. आता काय करावं? कदाचित ती जिथे वाढतात, टेकडीच्या माथ्यावर तिथे बिया लावून बघाव्या. बापूंनी तसं केलं. त्यांना दिसलं की रोपं उगवतात आणि मरून जातात. आता कसं करावं!

बापूंच्या लक्षात आलं की टेकडीवर झाडं तर पुष्कळ आहेत. त्यांनी चक्क मोजली. दोनशे झाल्यावर मग मोजणी सोडून दिली. म्हणजे झाडं वाढायला काही वेगळा मार्ग अवलंबत आहेत. काय असेल? काही वेळा उत्तर अगदी खणून काढावं लागतं. बापूंनी तेच केलं. त्यांनी जमिनीखाली खणून बघितलं. दोन फूट खणलं, उत्तर मिळेना. त्याच्याही खाली गेल्यावर मूळ दिसलं. उत्तर मिळालं. झाडाच्या मुळातून दुसरं झाड येतं.. मूळ जमिनीखाली आडवं वाढतं, नवीन रोप होऊन बाहेर पडतं. ते जगतं. मोठं होतं. त्याला फुलं फळं लागतात. पंधरावीस फूट प्रवास करून मूळ योग्य जागा शोधून बाहेर पडतं. एकेका ठिकाणी आठ दहा झाडं दिसून आली तर ती शंभर टक्के DNA सारखा असलेली एकमेकांची भावंडं असू शकतात. केवढी मोठी गोष्ट. अशा गोष्टी बापूंना कळल्या म्हणून आता झाडं लावताना विचार करावा लागतो. . 'झाड लावा झाड जगवा' सारख्या घोषवाक्यांवर आपला भारी विश्वास असतो. त्या घोषणा चुकीच्या नाहीत. आपल्याला उपयोगाची बरीच झाडं लावावी लागतात. पण समजा आपल्या मनात आलं टेकडी 'हिरवीगार' दिसली पाहिजे, चला झाडं लावूया. तर आपण काय करतो? खड्डे खणतो आणि झाड लावतो. आता तर जेसीबी येतो आणि मोठाले खोल खड्डे खणून जातो. पण असं काही करताना जमिनीखाली मूळं असतील तर त्यांचं काय होत असेल? त्यांना धक्का लागला तर नवी झाडं कशी उगवतील? आपण खूप खर्च करून झाडं लावून ती जगवू सुद्धा. आपल्याला हे माहीत हवं की झाडं आपली आपणसुद्धा पसरतात आणि वाढतात, काही झाडं तर फक्त तशीच वाढतात. त्यांच्या वाढण्यात तर आपण बाधा निर्माण करत नाही ना! हेसुद्धा बघायला हवं. बापूंमुळे अशा काय काय गोष्टी आपल्याला समजल्या.

बापू आता थकले आहेत. त्यांना आपल्या घराच्या खिडकीतून चिंचेचा एक सुंदर वृक्ष दिसतो त्याच्याशी त्यांच्या गप्पा चालतात. तो वृक्ष म्हणजे बापूंची चिंचसखी आहे. तिला ते विचारतात, 'सखे, कशी तू अशी उधळपट्टी करतेयस!? तुझी मुळं पाण्याचा शोध घेत खोलवर जातात, तुझ्या शेंड्यापर्यंत ते पाणी पोचतं आणि तू तुझ्या पानांवाटे जवळपास सगळं पाणी बाहेर टाकून देतेस?' चिंच सखी म्हणते, 'अरे तुझ्यासारखंच नाही का! तूसुद्धा जेवढं पाणी पितोस तेवढं सगळं बाहेर टाकून देतोस की नाही?' 'हो, ते बरोबर!' बापू म्हणतात, 'पण त्यासोबत शरीरातले नकोसे बरेचसे पदार्थ बाहेर टाकले जातात, शरीर चांगलं राहतं.' मग चिंच म्हणते, 'हो ना, मग मग माझंही असंच आहे बघ!' अशा गप्पा आणि असं विज्ञान!

जंगली बापूंच्या जंगली गोष्टी आता सोनसावरीच्या तलम कापसासारख्या वाऱ्याबरोबर सर्वत्र पोचोत. त्यातून रानवा निरंतर बहरत राहो.

**संपर्क – *ioraespune@gmail.com***

वरील आकृतीत जी चित्रे आहेत, त्यातील काही चित्रे खालील आकृतीत नाहीत ती शोधा पाहू.

घनश्याम देशमुख





# कुतूहल

अमित डहाणे, ९४२१०५०३८८

'किशोर' मित्रांनो, 'किशोर' एप्रिल २०२४ च्या अंकातील कुतूहलची किती उत्तरे तुम्ही बरोबर दिलीत? या अंकात दिलेल्या उत्तरांशी आपण दिलेली उत्तरे ताडून पाहा. तुमच्यासाठी आणखी काही प्रश्न दिले आहेत. स्पर्धकांनी प्रश्नांची उत्तरे कोणाचीही मदत न घेता स्वतंत्रपणे लिहून पाठवण्याचे पथ्य काटेकोरपणे पाळावे. अचूक उत्तरे 'किशोर'कडे २५ मे २०२४ पूर्वी अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावीत.

**१) अग्नी ५ या आंतरखंडीय क्षेपणास्त्राची चाचणी कोणत्या बेटावर घेण्यात आली?**
१) डॉ. ए. पी. जे. कलाम बेट २) अंदमान बेट
३) निकोबार बेट ४) लक्षद्वीप बेट

**२) देशातील कोणत्या किनाऱ्यावर हिवाळ्यात पाऊस पडतो ?**
१) सौराष्ट्र २ ) कोकण ३) मलबार ४)कोरोमंडल

**३ ) भारतात सर्वात प्रथम नागरिकत्व कायदा कधी करण्यात आला?**
१) १९४७ २) १९५५ ३) २०१४ ४) २०२४

**४) ९६ व्या ऑस्कर पुरस्काराने सर्वोत्कृष्ट चित्रपट असे गौरविण्यात आलेला 'ओपेनहायमर' हा चित्रपट कोणत्या क्षेत्रातील व्यक्तिमत्त्वाच्या जीवनावर आधारित आहे ?**
१) अणु बॉम्ब निर्मिती २) क्रीडा क्षेत्र
३) कला क्षेत्र ४) राजकीय क्षेत्र

**५) कोणत्या धार्मिक स्थळाला महाराष्ट्राची काशी असे संबोधतात?**
१) पैठण २) आळंदी ३) पंढरपूर ४) तुळजापूर

**६) 'मिस वर्ल्ड २०२४' ही स्पर्धा कोठे आयोजित करण्यात आली होती?**
१) मुंबई २) न्यू यॉर्क ३) टोकियो ४) लंडन

**७) 'पाषाण' या हिंदी कवितासंग्रहाला महाराष्ट्र हिंदी साहित्य अकादमीचा सुवर्ण पुरस्कार जाहीर झाला. हा कवितासंग्रह कोणाचा आहे?**
१) प्रशांत डिंगणकर २) चंद्रकांत पाटील
३) आनंद थत्ते ४) एकनाथ आव्हाड

**८) देशातील पहिल्या AI (Artificial intelligence) शिक्षिकेचे नाव काय आहे ?**
१) प्रज्ञा २) विदुषी
३) पंडिता ४) आयरिस

**९) भारतातील कोणत्या शहराला 'विज्ञान शहर' असेही म्हणतात?**
१) अंबाला २) पुणे ३) बंगळुरू ४) हैद्राबाद

**१०) भारतातील सर्वात लांब पल्ल्याच्या रेल्वे गाडीचे नाव काय आहे?**
१) सागर एक्सप्रेस २) विवेक एक्सप्रेस
३) झेलम एक्सप्रेस ४) कोकण एक्सप्रेस

**११) इंडियन ओपिनियन हे वर्तमानपत्र कोणी सुरू केले होते.?**
१) महात्मा गांधी २) लोकमान्य टिळक
३) भगतसिंग ४) पंडित नेहरू

**१२) कोणत्या तालुक्याला स्वराज्याची पहिली राजधानी राजगडचे नाव देण्यात येणार आहे?**
१) मावळ २) वेल्हे ३) जुन्नर ४) रायगड

**१३) कोणाच्या स्मरणार्थ 'मराठी गौरव भाषा दिवस' साजरा करण्यात येतो?**
१) केशवसुत २) बालकवी
३) कुसमाग्रज ४) साने गुरुजी

**१४) छत्रपती शिवाजी महाराजांनी स्वराज्याची शपथ घेतली तो रायरेश्वर किल्ला कोणत्या जिल्ह्यात आहे ?**
१) पुणे २) सातारा
३) बुलढाणा ४) कोल्हापूर

**१५) भारतात सर्वात अधिक बिबट्यांची संख्या कोणत्या राज्यात आहे ?**

१) महाराष्ट्र     २) छत्तीसगड

३) मध्य प्रदेश     ४) कर्नाटक



## चित्रकोडे

रचना - घनश्याम देशमुख

## एप्रिल-२४ शब्दकोडे उत्तर




## किशोर मार्च २०२४ कुतूहल यशस्वी स्पर्धक

- **सोलापूर** – कु. हर्षदा पिंपळे, कु. खुशी उभे
- **बुलडाणा** – कु. अन्विता दसोरे, कु. सोहम दसोरे

## किशोर एप्रिल २०२४ ची उत्तरे

| | | |
|---|---|---|
| १-३ | ६-१ | ११-२ |
| २-४ | ७-३ | १२-२ |
| ३-३ | ८-१ | १३-२ |
| ४-१ | ९-१ | १४-३ |
| ५-३ | १०-१ | १५-३ |

## किशोर मार्च २०२४ चित्रकोडे यशस्वी स्पर्धक

- **नागपूर** – कु. सांची सावंत, कु. नीरजा कुलकर्णी.
- **गडचिरोली** – कु. तनवी बंकावार.
- **सोलापूर** – कु. प्रमोदिनी पिंपळे.
- **पुणे** – कु. निकिता भवार, कु. आकांक्षा गायकवाड
- **सातारा** – कु. ध्रुव संतोष जगदाळे, कु. आर्यन जगदाळे, कु. श्रीयांश सावंत, कु. सुवीर फडे, कु. स्वरा अवघडे, वेदश्री कदम,
- **बीड** – कु. साजिता फरांडे, कु. त्रिशाली कापरे, कु. आर्या धोंडे, कु. साक्षी इरले, कु. साजिता फरांडे, कु. श्रावणी नालकोल, कु. आलिया शेख, कु. प्रिन्स बडे, कु. श्रेयश देवकर, कु. यश सानप, कु. संस्कार दुधाळ, कु. श्रेयश गायकवाड, कु. सिद्धांत दुधाळ, कु. आदर्श शिंदे, कु. धनराज राऊत, कु. आरशिया शेख, कु. रोशनी गायकवाड, कु. अश्विनी शेळके, कु. श्रावणी दुधाळ, कु. समीक्षा देवकर, कु. संचिता सालपे.
- **ठाणे** – कु. पृथु ताटके, ■ **गोवा** – कु. वेदिका वेर्लेकर
- **नांदेड** – कु. जैद सिद्धीक शेख, कु. जीक्रा सिद्धीक शेख,
- **सांगली** – कु. वेदांत कदम, कु. स्वप्नील उदगिरे, कु. विराज सायमोते, कु. गौरव खांडेकर, कु. प्रणित पांढरे, कु. जोया अथणीकर, कु. रिजवान ढगे, कु. संस्कृती कुंभार, कु. रिद्धी चव्हाण, कु. ध्रुव खाडीलकर, कु. समद शेख, कु. धैर्यशील खोत, कु. जान्हवी नलवडे, कु. मन्मथ जेऊर
- **नाशिक** – कु. गुणेश्वरी गावित.
- **सिंधुदुर्ग** – कु. गार्गी कुबडे, कु. तन्वी पेडणेकर, कु. धनश्री धुरी, कु. वैष्णवी धुरी, कु. वासंती धुरी.
- **अकोला** – कु. पायल काटे, कु. सुरज आंबुस्कर, कु. आर्यन फासे, कु. सार्थक पिलांत्रे.
- **बुलडाणा** – कु. पायल ठाकरे, कु. अंजली राऊत, कु. नव्या ढगे, कु. सृष्टी दामधर, कु. वैष्णवी भोलकार, कु. जान्हवी तळोकार, कु. अंजली राऊत, कु. कृष्णाली गावंडे, कु. श्रृती राऊत, कु. दिव्या भामद्रे, कु. प्राजक्ता दामधर, कु. आर्या शितकणगे, कु. भाग्यश्री सोनेने, कु. भक्ती वाफोडे, कु. धनश्री तारू.
- **अमरावती** – कु. कृष्णा पेटकर.
- **कोल्हापूर** – कु. आदिनाथ पाटील.
- **धुळे** – कु. श्रावणी पुराणिक, कु. प्राची सांगुवेठे.

# भावी आधारस्तंभ

माणूस जेव्हा एखादी चांगली गोष्ट करतो, तेव्हा आपण त्याला चांगला म्हणतो. अशा चांगल्या गोष्टी तुम्हीही नक्कीच केल्या असतील.

- तुम्ही दुसऱ्यांबद्दल आपुलकी आणि सहानुभूती दाखवता का?
- जे तुमच्यापेक्षा लहान आणि दुर्बल आहेत त्यांचे रक्षण करता का?
- ज्यांना मदतीची गरज आहे त्यांना मदतीचा हात देऊ करणे म्हणजे चांगुलपणा, असे तुम्हांलाही वाटते ना?

मग लागा पाहू लिहायला. त्यासाठी सदर आहे – 'भावी आधारस्तंभ'. तुम्हांला मानधन व वर्षभर अंक मिळेल. तुम्ही केलेल्या सत्कृत्याचा १० ते १५ ओळी मजकूर सुवाच्य अक्षरांत लिहा. तुमचे संपूर्ण नाव, पत्ता (पिनकोड नंबरसह), शाळेचे नाव, वय, इयत्ता इत्यादी तपशील द्या. पासपोर्ट आकाराचा फोटोही लावा. पाकिटावर रु. ५/- चे तिकीट लावून अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवा.



मे महिन्याची सुट्टी होती. एका संध्याकाळी मी शेताकडे गेले होती. आमच्या शेताच्या शेजारच्या रानमाळावर मेंढरं चरताना दिसली. एका कोपऱ्यात दोन पालं दिसली. मी पुढे जाऊन पाहिले तर एक माझ्याच वयाची मुलगी तिच्या भावंडांसोबत खेळत होती. तिने तिच्या परकरात पाच-सहा खडे ठेवले होते. एक-एक करून ती खडे उंच फेकायची. आपल्या हातात झेलायची. तिच्या बोलीभाषेत बोलायची. मी तिचा खेळ बराच वेळ बघत होते. मी तिच्याशी बोलण्यासाठी तिच्या पालाजवळ गेले. तोच एक कुत्रा जवळ आला. मी घाबरले. मग त्या मुलीने कुत्र्याला धरले. ती माझ्याशी बोलू लागली. मी तिला ती खेळत असलेल्या खेळाचे नाव विचारले. ती हसून म्हणाली 'खड्यांचा खेळ.' खडे उडवायचे नि मोजायचे. ''मी तिला तिच्या शाळेविषयी विचारले तेव्हा ती म्हणाली, ''मला पन वाचायला शिकायचयं. पण माझ्याकडे पुस्तक, पेन नाही. हे ऐकून मला वाईट वाटले. मी घरी आल्यावर माझी शाळेतील जुनी पुस्तके शोधली. एक वहीही सापडली. माझ्याकडे तीन-चार पेन होते. त्यातील एक नवा कोरा पेन मी तिला देण्याचे ठरवले. माझी ही गडबड पाहून आईने मला सांगितले. ''काय करतेस''? मी तिला शेतावरील सुमाविषयी सांगितले, तेव्हा आई म्हणाली, ''अगं, तुझं जुनं दप्तर चांगले आहे. तेही दे सुमाला.'' मला तर खूपच आनंद झाला. दुसऱ्या दिवशी संध्याकाळी मी व माझा धाकटा भाऊ असे दोघे शेताकडे गेलो. सुमाला बोलावले. ती जवळ आल्यावर तिला दप्तर दिले. त्यात पुस्तके पेन, वही हे साहित्य दिले. आमच्या चैतन्याने तिला पेन्सिल व खोडरबर दिला. आम्ही घरी आल्यावर आई-बाबा आजोबा यांनी आमचे कौतुक केले. मला तर खूपच आनंद झाला होता.

**कु. स्वप्नाली सोमनाथ विशे**

इ.५वी, जि.प.शाळा-सोनावळे, पो.पळू, ता. मुरबाड, जि. ठाणे - ४२१४०२.



ही घटना गेल्या वर्षीच्या एप्रिल महिन्यात घडलेली. बाबांच्या आग्रहास्तव मी आणि बाबा पोहण्यासाठी गेलो. पोहण्याच्या कार्यक्रम आधीच्या दिवसापेक्षा अधिक उत्साहाने पार पडला. आज मी खूप वेळ पाण्यात पोहलो. पोहल्यानंतर बाहेर आल्यावर घडलेला प्रसंग माझ्या चांगला आठवणीत आहे.

मी बाबांच्या आधी बाहेर आलो. पटकन आवरले. आम्ही पोहत होतो त्या विहिरीच्या जवळच काचेची बाटली फुटून सर्वत्र काचा पसरल्या होत्या. मी पटकन त्या सर्व काचा एकत्र करू लागलो. तोपर्यंत बाबा बाहेर आले. बाबांनी विचारले 'काय करतोस' मी उत्तर दिले की, ''काचा गोळा करतोय.'' बाबा म्हणाले ''का?'' मी पट्कन म्हणालो '''यातील काच आपल्याच कोणाच्या तरी पायाला लागेल. रक्त येईल. जखम होईल म्हणून मी गोळा करतोय.''

हे सांगून मी सर्व काचा गोळा करून एका पिशवीत भरून बाबांच्या हातात दिल्या. बाबांनी त्या घेतल्या, मला जवळ घेतले व म्हणाले ''अशाच प्रकारे नेहमी आपल्याआधी दुसऱ्याची काळजी घे.''

बाबांच्या चेहऱ्यावरील आनंद पाहून मला खूप आनंद झाला.

**चि. अर्णव संदीप कोळी (इ.४ थी)**

माई बाल विद्यामंदिर इचलकरंजी, ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर- ४१६११५



मी एकदा माझ्या गावाला खळटीपाड्याला गेले होते. ती सायंकाळची वेळ होती. मी व माझे बाबा घराच्या अंगणात होतो. बाबा माझ्यासाठी चिखलमातीचे घर बनवत होते. आमच्या घराभोवती शेत आहे. तिथला संपूर्ण परिसर खूप सुंदर आहे. येथे भरपूर पशु- पक्षी पहायला मिळतील. मुले देखील भरपूर खेळतात. सुट्टीच्या काळात मला शहरातून गावात येऊन राहायला खूप आवडते.

माझे बाबा व मी मातीचे छोटेसे घर बनवण्यात मग्न होतो. तेवढ्यात माझे लक्ष समोरच्या शेतात गेले. त्या ठिकाणी माझ्या बाबांनी बकऱ्या चारण्यासाठी सोडल्या होत्या. त्यापैकी एका शेळीवर एका कुत्र्याने हल्ला केला. ते कुत्रे त्या शेळीच्या पायाला पकडून ओढत होते. ती शेळी जोरजोरात ओरडत होती. मी त्या कुत्र्याला दगड मारला. बाबा ताबडतोब बकरीजवळ गेले व बकरीला घरी घेऊन आले. तिच्या पायाला कुत्र्याने चावल्याने जखम झाली होती. मी घरात जाऊन हळद व पट्टी घेऊन आलो व बकरीच्या जखमेवर हळद व स्वच्छ कापड बांधले. माझ्यामुळे आमच्या बकरीचे प्राण वाचले असे घरातील सर्व जण म्हणू लागले. मला शेळीचा जीव वाचवल्याबद्दल खूप समाधान वाटले.

**कु. वैदेही रविंद्र भोये** (इ.५ वी)
स्वामी विवेकानंद बालविकास मंदिर, चौगाव रोड,
सटाणा, नाशिक- ४२३३०१.



उन्हाळ्याच्या सुट्टीत पोहण्याच्या शर्यतीत भाग घेण्यासाठी मी बीडमधील जलतरण तलावात गेलो होतो. स्पर्धा सुरू होण्यासाठी अर्धा तास बाकी होता. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आलेली मुलं-मुली वडापाव, सँडविच वगैरे खाण्यात दंग होते. अचानक उडत-उडत आलेले एक कबुतर जलतरण तलावातील स्पर्धेसाठी लावलेल्या दोरीत अडकले. ते फडफड करून निघण्यासाठी प्रयत्न करत होते व त्याला निघता येईना. मी पटकन जाऊन एका बाजूने दोरी हलवली असता त्या कबुतराचे अडकलेले पाय सुटले. हळूहळू पोहत पोहत ते जलतरण तलावाच्या कोपऱ्यात गेल्यावर जवळच्या एका मुलाने त्या कबुतराला पाण्याच्या बाहेर काढले. कबुतर पाण्याच्या बाहेर आल्यावर पट्कन उडत उडत दूर गेले. हे सर्व पाहून मला खूप आनंद झाला.

**कु. आरुष राजेंद्र भोले**
चंपावती विद्यालय बीड,
वर्ग-७ वा, तुकडी (ई)
ता. जि. बीड- ४३११२२.



आमच्या गावात आठवडी बाजार नसतो, आम्हांला बाजारासाठी एक किलोमीटर दूर जावे लागत असे. मी एकदा बाजारात जात असताना एका आजीने मला आवाज दिला आणि म्हणाली ''मलासुद्धा भाजीपाला आणि काही सामान आणून देशील का?'' मी हो म्हणाली. आजीला बरे वाटले. मी आणि माझी बहिण आम्ही बाजारात जाऊन आजीचे आणि आमचे सामानसुद्धा आणले. आजी आमची वाटच पाहात होती. आजीला सामान आणून दिल्यामुळे तिला खूप आनंद झाला. आजीने आम्हांला तिच्याजवळची बोरं दिली आणि आम्ही आनंदाने घरी पोहोचलो. आजीला मदत करून मलासुद्धा खूप आनंद झाला होता.

**कु. रोहिणी मोहन कात्रे** (इ.७ वी)
जि.प.पूर्व माध्यमिक शाळा, जैनपूर, ता. दर्यापूर, जि. अमरावती- ४४४७०६

उमलती प्रतिभा

# आजी आणि भाजी



आजी गं आजी, काय करते भाजी ,
शेतातून आणू का, मेथी ताजी...

भाजीचे मी खुडते पानं,
तू कर भाजी छान छान.

आजीने दिली भाजीला फोडणी ,
मिठासोबत टाकली थोडी चटणी.

भाजी केली खूप चवदार,
आजीचे मानले मी आभार .

माझी आजी खूप हुशार ,
स्वयंपाकाचे ज्ञान तिला फार.

आजी माझी आहे कष्टाळू,
शेताला नेसवते हिरवा शालू.

कु. प्रांजली ज्योती राजुपाल काकडे
इयत्ता- ३ री, जिल्हा परिषद प्रा.शाळा रायपूर,
तालुका सेलू, जिल्हा- परभणी ४३१५०३

# हिरवे शेत



बे एके बे, बे दुणे चार,
शेत माझे हिरवे हिरवे गार,

बे सक बारा, बे नवे अठरा,
शेतावर आला गार गार वारा..

बे एके बे, बे दाही वीस
उडत आले चिमणीचे पीस.

शेतात पडले चिमणीचे पीस,
घरटे बनवायला चिमणीने उचलले पीस

चिमणीचे घरटे बनले झाडावर
चिव चिव करती पिले शेतावर

कु. यश शंकर पाईकराव
(इ.२ री), जि.प.प्रा.शाळा रांजनगाव
(शें.पु.), पो. धाणेगाव, ता. गंगापूर,
जि. छत्रपती संभाजीनगर ४३११३६

# माझी स्मरणीय सहल

नमस्कार, बालमित्रांनो, आज मला तुम्हांला माझ्या शैक्षणिक क्षेत्र भेट सहलीबाबत सांगायचे आहे. तसेच तुम्हांला मी अनुभवलेल्या एरोस्पेस म्युझियमची माहिती देणार आहे. आपल्याला सांगताना मला खूप आनंद होत आहे. माझी शैक्षणिक सहल ओझर-मिग येथील एच.ए.एल कारखान्यातील 'प्रगती म्युझियम' येथे गेली होती. अतिशय सुंदर असे म्युझियम आम्हांस बघावयास मिळाले. या म्युझियममध्ये विमाना संबंधित सर्व माहिती आम्हांला मिळाली. त्यात लढाऊ विमानाचे नाव, लढाऊ विमान कसे तयार होते, याविषयी सर्व माहिती मिळाली व प्रत्यक्षात विमानाचे सर्व भाग आम्हांला बघायला मिळाले. विमान बघताना मला खूपच आश्चर्य व अभिमान वाटला. यामध्ये पायलटचे कपडे, पायलट जिथे बसतो त्याचे सीट तसेच विमानाचे टायर, पेट्रोल टाकी असे भाग बघितले. त्यानंतर लढाऊ विमान आपल्या देशाच्या संरक्षणासाठी किती महत्त्वाचे काम करते याचा अनुभव मला मिळावा म्हणून टी.व्हीवर आम्हांला लढाऊ विमानांचे फायटिंग दाखविण्यात आले. आम्ही विमानांसमोर खूप सारे फोटो काढले. त्यानंतर गार्डनमध्ये स्नेहभोजनाचा आनंद घेतला. जे विमान मी फक्त लांबून आकाशात बघत होते त्याला सहलीमुळे अगदी जवळून बघता आले. कदाचित मी कधीही विमानात बसू शकले नसते पण या सहलीमुळे मला लढाऊ विमानाची संपूर्ण माहिती मिळाली. ही सहल मला खूपच आवडली. ती कायम माझ्या स्मरणात राहील. मी या सहलीसाठी आमचे वर्गशिक्षक देवेंद्र वाघ सर व सर्व शिक्षकांचे मनापासून आभार मानते. मला खूप अभिमान आहे की मी या चांगल्या शाळेत शिकते.

**कु. सारीका पंडीत रेहरे** (इ.५ वी)
जि.प.शाळा देवीचा माथा (पि.स.),
ता. निफाड, जि. नाशिक- ४२२२०९



**ईश्वरी मोतीराम विशे**
इ. ६ वी, जि.प. शाळा सोनावळे,
ता. मुरबाड. जि. ठाणे- ४२१४०२




**परी अमोल पवार**
इ. ४ थी, जि. प. शाळा भाटमरळी,
ता. जि. सातारा- ४१५००२


कुणीतरी आहे तिथं
घनश्याम देशमुख संपर्क : ९८२३४१३६२९
नंदू, तुला सारखं कुणीतरी असल्याचा भास होतोयं
ते बघ त्या झाडामागे लाल पागोटं घातलेला...
अरे ! हे तर लाल रंगाचं कापड आहे... कुणी बांधलं?
माणसानेच बांधलं असेल. पण या जंगलात यायला तर सगळेच घाबरतात
ते नंतर बघू, चल आपल्याला तो बंगला बघायचा आहे.
एके ठिकाणी....
थांब, पुढे पाऊल टाकू नकोस..
इथे मोठ्ठा खड्डा आहे. तो दिसू नये म्हणून त्यावर पालापाचोळा टाकलाय
प्राणी पकडण्यासाठी


नाही... या जंगलात मोठे प्राणी नाही येत, मग हा सापळा कुणासाठी रचलाय आणि कोणी
कोणी?
फारच रहस्यमय आहे हे जंगल! नेमकं काय गूढ आहे ते शोधायला हवं...
सिकंदर, तुझी जासूसी जरा बाजूला ठेव.
मला आता भीती वाटायला लागली रे, चल घरी परत जाऊया..
या जंगलात आहे कोण? भूत, एलियन की माणसं याचा शोध तर मी लावणारच...
पुढे गेल्यावर...
ते बघ तो भूतिया बंगला दिसतोय.
थांब! कुणीतरी आपला पाठलाग करत आहे. आपल्या शिवाय..
कुणीतरी आहे इथं...
क्रमशः...

# अगं अगं मुंगे

■ सुनंदा भावसार

अगं अगं मुंगे, खेळतेस माझ्यासंगे?
मला नाही शाळा, आणि आला खूप कंटाळा!

नको नको बाबा आता, जवळ आला पावसाळा
एक एक कण धान्याचा, करून ठेवते गोळा!

मधमाशे मधमाशे, कुठे घेतेस भरारी?
खेळ ना गं माझ्याशी, कंटाळलो मी भारी!

अरे बाबा साऱ्या जातील, मीच राहीन एकटी
मधमाशी कधी तरी, घेते का सुट्टी ?

आई आई कुण्णीच नाही, माझ्या सोबत खेळायला
तू सुद्धा कामात असतेस, बाबा गेलेत ऑफीसला

दप्तर, गणवेश, बुट तुझे; बघून ठेव ना बाळा!
बघता बघता तुझी आता, सुरू होईल शाळा!

अरे बाप रे कंटाळण्यातंच, निघून गेला उन्हाळा
कित्ती गोष्टी राहून गेल्यात, अस्सा भोवतो कंटाळा!

संपर्क : ९०९६३४९२४१



इंग्रजी विभाग

# From my bicycle

■ Renuka Billore

Cautiously than a cheetah
Smaller than an elephant
My bicycle, it goes
Performing small stunts.
It has a pink carrier
Decorated with a rose flower
It has a marvelous smell
Which lasts always and forever.

I enjoy the sights
Of hedges along the road
And I see a donkey
Carrying a Sack of load.
His master sits on him
As he gazes at me,
I rang bell and off he falls
Angrily Looking at me…

There is a bus I see,
The passengers were clambering
A tramp entered the bus
By himself was he crambling,
He was blind!!
He has a bowl in his hand.
I see the dishonesty,
As a  man takes all the money
And and refills it with – sand…
OH ! This cruel world!!


Now my bicycle is tired
And wanted to take a rest.
But I sadly tell her
We should not rest here; it is of waste
So we went to home as slow as ship
But can you tell me
How was our trip?

Contact : 9370824605



B. N. Chaudhari

# When, River talks with Uday



One day, Uday, a young boy, wandered off In the Jungle and got lost. Suddenly he saw a beautiful lady sitting on some big stones. She looked quite worried. Uday asked, “Who are you?”

The lady replied, "I am a river. Are you familiar with the word ‘river’? Anyway, Let me introduce myself to you today. Who am I ? Where did I come from ? What is my origin?"

"Wow, are you a river that flows with water? Ofcourse I am familiar with the word ‘river’. What are you going to tell me?" Uday asked her with curiosity.

"Yes, I am known by different names like Sarita, Jeevandayini, River etc. Naturally, I am playful but I do have mood swings. Sometimes I become calm. I keep drifting along. I flow continuously without stopping, without getting stuck. I was born in the mountains, from where the springs come out of the rocks.I flow down to the plains, I flow through forests and villages and then reach the sea."

My size, i.e. my width is large or small depending on the location. There are many obstacles in my way, sometimes rocks and sometimes big mountains. But, I never stop. I make my own way and flow. Man is completely dependent on me in many ways. You may also say that, I am very useful to man. Man describes me as LIFE. I help man to live life in many ways. Many aquatic animals live in my waters and man catches them and eats them. In this way I satisfy man's hunger. Because of me, all the houses on the earth have water system. Water is useful for daily life of human beings."

" Oh, it's wonderful. you are so useful for us." Uday said.

"Not only am I useful for man, but I also I help man in maintaining the balance of the environment. With the help of my water. Man creates electricity. This electricity is used for the running of so many devices. The farmer uses my water for crops in the field. The crops wave with gratitude when I flow through them in the fields. Flowing through the forest, I quench the thirst of wild animals and birds. I also supply water to the forest trees." she completed.

" It's so nice of you dear. Even my heart is filled with gratitude! " Uday thanks her. “But why do you look so worried?”

" Uday, look ! Even I have feelings like you. I too feel happy and sad. I find man very greedy. He can do anything to fulfill his selfishness. On one hand I am worshiped as a goddess by man, but on the other hand people only use me to fulfill their desires. In today's situation, the water of the river is highly polluted. Toxic waste from big factories, sewage from houses, plastic, ashes of dead people, waste from various festivals and events mix in my water and pollute me."

Uday felt ashamed of himself, as he listened to the bad habits of man and the tragedy of the river.

He asked her, "What can we do for you dear river ?"

" You people can do so much for me. Please stop this pollution. I want to warn you that, "To pollute me, is to destroy the entire mankind. Because if I get excessively polluted, man will not get clean water to drink, giving rise to diseases, pandemics and epidemics. Diseases will increase by drinking impure water. Therefore, everyone should consider their duty today. Take decisions to keep the river and the entire environment clean." she advised him.

Uday’s eyes widened with fear as he listened to the problems of the river. He started shivering with fear. Suddenly he fell down from his bed making a loud noise. He woke up. He did not find anyone beside him and realised it was a dream.

His mother asked him, "what's happened Uday ? Did you have a bad dream?”

He narrated the entire dream to his mother. He promised his mother that he would use water very carefully. He will play his role to save the river from all kinds of pollution by contributing his little bit of responsible behaviour. He decided to dispose garbage in the correct way and spread the message of the civic responsibilities of every citizen. Uday’s mother thanked his teacher for the effective lesson on WATER, the previous day.

Contact : 9423492593

# Funny Puzzle

Ghanshyam Deshmukh

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 4 | + | | = | 7 |
| - | | - | | - |
| | + | 1 | = | |
| = | | = | | = |
| 3 | + | | = | 5 |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 7 | - | | = | 4 |
| + | | + | | + |
| 7 | - | 5 | = | |
| = | | = | | = |
| | - | | = | 6 |



Fill in the missing numbers to complete the sums.

Hidden in the grid are names of seven games. Circle them.


| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| B | F | C | R | I | C | K | E | T |
| A | L | S | T | M | J | S | P | E |
| S | H | O | C | K | E | Y | F | N |
| E | O | C | T | L | N | B | E | N |
| B | G | C | H | G | O | L | F | I |
| A | J | E | A | L | M | G | K | S |
| L | I | R | U | G | B | Y | T | K |
| L | F | O | O | T | B | A | L | L |



# चित्रकोडे

रचना - घनश्याम देशमुख

हे चित्रांचे शब्दकोडे आहे. यात चित्रांची नावे लपलेली आहेत. प्रत्येक चित्र बघून खालील चित्रकोडे पूर्ण करा.




## सूचना

१) स्पर्धकांनी आपले नाव केवळ पाकिटावर न लिहिता कोडे सोडवले असेल त्या कागदावर लिहिणे आवश्यक आहे.


२) कोड्याचे उत्तर पाठवण्याची अंतिम तारीख २५ मे २०२४.

३) कोड्याचे उत्तर जून २०२४ च्या अंकात प्रसिद्ध होईल.

४) कोडे वेगळ्या कागदावर सोडवले तरी चालेल.

Registered R.N.I.NO. 22679/72

Kishor (Marathi) Postal Regd.No. PCW/076/2024-2026 Registered Newspapers posted at PUNE PSO, GPO- 411 001
The date of publication 26.4.2024 Posting on 27th & 28th April 2024
License to Post without prepayment of postage No. WPP-53




ऑनलाईन वर्गणीकरिता क्यूआर कोड स्कॅन करा

**If not delivered please return to :**
संपादक, 'किशोर' मासिक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
बालभारती, सेनापती बापट मार्ग,
पुणे- ४११ ००४.
दूरध्वनी : ०२०- २५७१६२४४
ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in
वेबसाईट : www.kishor.ebalbharati.in

प्रति,